रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक २८२
www.ramprahar.com


# राम प्रहर

बुधवार, ३० एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

'आपत्ती व्यवस्थापनासाठी यंत्रणांचा समन्वय आवश्यक'/२
रोह्यातील प्रश्नांसंदर्भात भाजयुमोकडून पाहणी/५
जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत कुईस संघ विजेता/८

## सरदार रघुजी भोसले यांची तलवार मिळवण्यात यश



**मुंबई :** नागपूरच्या भोसले घराण्याचे संस्थापक आणि छत्रपती शाहू महाराजांच्या काळातील मराठा सैन्यातील एक महत्त्वाचे सरदार रघुजी भोसले यांची लंडन येथे लिलावात निघालेली तलवार मिळवण्यात सरकारला मोठे यश आले आहे, अशी माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी मंगळवारी (दि. २९) दिली. लिलाव जिंकून आपली ऐतिहासिक वस्तू परदेशातून परत मिळवण्याची ही पहिलीच वेळ असून याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आशिष शेलार यांनी आभार मानले. ऐतिहासिक दस्तऐवज असलेली सदर तलवार लिलावात निघाल्याचे वृत्त सोमवारी अचानक येऊन महाराष्ट्रात धडकले. ना. शेलार यांना ही बातमी कळताच त्यांनी तातडीने मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी चर्चा करून ही तलवार शासनाला मिळावी या दृष्टीने नियोजन करण्यात आले. त्यानुसार लिलावात शासनाने सहभाग घेतला व लिलाव जिंकला.

# इलेक्ट्रिक वाहन धोरणास मंजुरी

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध निर्णय



**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि. २९) झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध निर्णय घेण्यात आले. यात राज्य सरकारने नवीन इलेक्ट्रिक वाहन धोरणास मंजुरी दिली असून या धोरणांतर्गत विशिष्ट इलेक्ट्रिक गाड्यांना काही निवडक रस्त्यांवर टोलमुक्ती दिली जाणार आहे तसेच प्रवासी इलेक्ट्रिक गाड्यांवर अनुदान दिले जाणार आहे.

महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण २०३०पर्यंत लागू राहील. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक अशा येत्या पाच वर्षांसाठी एक हजार ९९३ कोटी रुपयांच्या निधीच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली. या धोरणामुळे इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादन व वापरास मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार आहे. चार्जिंगविषयक पायाभूत सुविधांचा विस्तार करून आणि पर्यावरणीय शाश्वतता, आर्थिक वाढ व उर्जा सुरक्षिततेमध्ये योगदान देणाऱ्या शाश्वत आणि नाविन्यपूर्ण परिवहन उपाययोजनांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. यामुळे राज्यात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर व विक्रीत मोठी वाढ अपेक्षित आहे.

ईव्ही धोरणासह राज्य सरकारने आणखी एक धोरण मंजूर केले आहे. हे जहाज बांधणी क्षेत्राशी संबंधित धोरण आहे. आपल्या राज्यात जहाज बांधणी, जहाजांची देखभाल-दुरुस्ती, रिसायकलिंग/ब्रेकिंग अशा तिन्ही क्षेत्रांमधील कामे व प्रकल्प वाढले पाहिजेत. त्यातून राज्यात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

याशिवाय प्रधानमंत्री - यंग अचिव्हर्स स्कॉलरशिप ॲवार्ड स्किम फॉर व्हायब्रंट इंडिया या एकत्रिकृत शिष्यवृत्ती योजनेच्या केंद्राच्या मार्गदर्शक सूचना राज्यात लागू करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

## पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबियांना ५० लाखांचे अर्थसहाय्य

### मुख्यमंत्री फडणवीस यांची मोठी घोषणा

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबातील वारसांना ५० लाख रुपयांचे अर्थसहाय्य देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (दि. २९) मंत्रिमंडळ बैठकीत केली. तत्पूर्वी मंत्रिमंडळ बैठकीत मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

दहशतवादी हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबांतील मुलांच्या शिक्षणाकडे, रोजगाराकडे राज्य सरकार लक्ष देणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी स्पष्ट केले तसेच मृतांपैकी ज्यांच्या कुटुंबात रोजगाराचा प्रश्न आहे, त्यांच्या थेट वारसांना शासकीय नोकरी देण्याचा निर्णय मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या विशेषाधिकारात जाहीर केला. हल्ल्यातील मृतांपैकी जगदाळे यांच्या कुटुंबातील मुलीला नोकरी देण्याचा निर्णय कालच मुख्यमंत्र्यांनी जाहीर केला होता.

पहलगाम येथे गेल्या आठवड्यात पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात तब्बल २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. यामध्ये महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा समावेश होता.

## पायाभूत सुविधांसाठी ट्रस्टची स्थापना

राज्यात रस्ते व पूल आदी पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना गती देण्यासाठी आणि भांडवल उभारणीसाठी 'महा इनविट' स्थापन करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. यामुळे पायाभूत सुविधांच्या विकासासाठी निधी संकलनास नवे व्यासपीठ उपलब्ध होणार असून खासगी व सार्वजनिक गुंतवणूकदारांना स्थिर परताव्याची संधी मिळेल. 'महा इनविट' अंतर्गत शासन ट्रस्ट स्थापन करणार असून त्यात प्रायोजक, गुंतवणूक व्यवस्थापक, प्रकल्प व्यवस्थापक अशी रचना असेल.

## सुधारित पीक विमा योजना होणार लागू

सर्वसमावेशक पीक विमा योजनेत बदल करून पीक कापणी प्रयोगांवर आधारित सुधारित पीक विमा योजना राबविण्यास आणि केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार शेतकऱ्यांकडून शेतकरी हिस्सा, खरीप पिकासाठी दोन टक्के रब्बी पिकासाठी दीड टक्के व नगदी पिकांना पाच टक्के याप्रमाणे ठेवण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयानुसार एक रुपयात विमा देण्याऐवजी आता शेतकरी हिस्सा खरीपासाठी दोन टक्के, रब्बीसाठी १.५ टक्के आणि नगदी पिकांना पाच टक्के ठेवण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

याशिवाय शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक वाढून पायाभूत सुविधा निर्मितीवर भर देणारी नवीन योजना राबविण्यास या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या योजनेसाठी पुढील पाच वर्षांत दरवर्षी पाच हजार कोटी याप्रमाणे एकूण २५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे.

# पंतप्रधान मोदींचे लष्कराला पूर्ण स्वातंत्र्य

## पाकिस्तानला उत्तर देण्यासाठी उच्चस्तरीय बैठकीत ठरली रणनीती



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकार ॲक्शन मोडमध्ये दिसत आहे. पाकिस्तानवर अनेक निर्बंध लादल्यानंतर पुढील रणनीती ठरवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि. २९) उच्चस्तरीय बैठक बोलावण्यात आली होती.

या वेळी पंतप्रधान मोदींनी दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी भारतीय सैन्याला पूर्ण स्वातंत्र्य दिले असल्याचे सांगितले जात आहे.

या बैठकीत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि संरक्षण प्रमुख जनरल अनिल चौहान यांच्यासह तिन्ही दलांचे प्रमुख उपस्थित होते.

मिळालेल्या माहितीनुसार पंतप्रधानांच्या निवासस्थानी झालेल्या या बैठकीत हल्ल्यानंतरची परिस्थिती, सुरक्षा दलांची कारवाई आणि भविष्यातील रणनीती यावर सविस्तर चर्चा झाली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार पंतप्रधान मोदींनी लष्कराला पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. ते म्हणाले, दहशतवादाला योग्य उत्तर दिले जावे. हल्ल्याचे लक्ष्य आणि वेळ सैन्याने ठरवावी.

याशिवाय अमरनाथ यात्रा आणि इतर नागरी उपक्रमांच्या सुरक्षेत कोणतीही चूक होणार नाही याची खबरदारी घेण्यासही पंतप्रधान मोदींनी सांगितले आहे.

## धरणात बुडून तरुणाचा मृत्यू

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पाली भुतवली धरणात बुडून एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी (दि. २९) घडली. मनीष छोटेलाल कनोजिया (वय १८, रा. घाटकोपर) असे मयत तरुणाचे नाव आहे.

मनीष व त्याचे तीन मित्र पाली भुतवली येथे आले होते. धरणातील पाण्याचा अंदाज न आल्याने मनीषचा बुडून मृत्यू झाल्याचे सांगितले जात आहे. इतर मित्रांनी याबाबत नेरळ पोलिसांना कळवले. अपघातग्रस्त टीमने मृतदेह बाहेर काढला. या घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

## प्रत्येक मंडळात महाराजस्व अभियान राबविण्यात येणार

**अमरावती : प्रतिनिधी**

राज्य शासनाने पारदर्शी आणि गतिमान सरकारचे धोरण ठरविले आहे. शासकीय कार्यालयातील कामे सहजपणे आणि विनातक्रार होण्यासाठी यंत्रणा राबविण्यात येत आहे. नागरिकांच्या आवश्यक कामांसाठी आता प्रत्येक मंडळात महाराजस्व अभियान राबविण्यात येणार आहे, अशी माहिती महसूलमंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

मंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, नागरिकांचे जीवनमान सुकर करण्यासाठी विविध पावले उचलण्यात येत आहे. नागरी कामे प्रामाणिकपणे करून न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. मंडळ स्तरावर होणाऱ्या महाराजस्व अभिनायात आलेल्या नागरिकांच्या अर्जावर त्याच ठिकाणी निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे. जनतेचे कल्याण करण्याचा संकल्प करण्यात आला असून प्रशासनाचे सहकार्य यात घेतले जात आहे. या वेळी बचतगटांना स्वनिधी, ट्रॅक्टर, कृषी अवजारे, तीनचाकी सायकल, विहिरीचे कार्यादेश आदी लाभांचे वाटप करण्यात आले.

## निवडक

### बंगळुरूत पाकिस्तान जिंदाबाद म्हणणाऱ्याचा मारहाणीत मृत्यू

**बंगळुरू :** पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देशात पाकिस्तानविरुद्ध संतापाचे वातावरण आहे. दरम्यान, कर्नाटकची राजधानी बंगळुरूमध्ये स्थानिक क्रिकेट सामन्यादरम्यान एका व्यक्तीने 'पाकिस्तान झिंदाबाद'चे नारे दिले. त्यामुळे संतप्त नागरिकांनी त्याला मारहाण केली. या घटनेत त्याचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी १०-१२ जणांना अटक केली आहे.

### जम्मू काश्मीरमधील ४८ पर्यटनस्थळे बंद; सुरक्षेच्या कारणास्तव निर्णय

**श्रीनगर :** जम्मू काश्मीर सरकारने पहलगाम हल्ल्यानंतर मोठा निर्णय घेत संवेदनशील भागातील ४८ पर्यटनस्थळे पर्यटकांसाठी बंद केली आहेत. सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आला आहे.

## माणगावमध्ये दोन वाहने जाळली

### अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**





माणगाव शहरातील उतेखोलवाडी येथील एका राहत्या घरासमोर उभी केलेली रिक्षा व मॅक्सिमो ही वाहने अज्ञात व्यक्तीने रात्री पेटवून दिली. यामध्ये दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे.

बाळा वाघमारे यांचे मुलगे विलास वाघमारे, विनायक वाघमारे यांच्या रिक्षा (एमएच ०६ झेड ४२५७) आणि मॅक्सिमो (एमएच ०६ बीई ५४६) या गाड्या जळून खाक झाल्या आहेत. माणगावच्या महाराणा प्रताप नगरमधील रोहिदास पवार यांच्या स्विफ्ट डिझायर कारखालीही एका मनोविकृत व्यक्तीकडून आग लावण्याचा प्रयत्न झाला होता, मात्र प्रसंगावधान राखल्याने हा अपघात टळला.

उतेखोलवाडीतील वाघमारे यांच्या गाडी जाळल्याप्रकरणी माणगाव पोलीस ठाणे येथे अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

# आंतरराष्ट्रीय ड्रग्ज सिंडिकेट उद्ध्वस्त

## कस्टम अधिकारी, पोलीस, खेळाडूसह १० जणांना अटक



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखा पथकाने आंतरराष्ट्रीय ड्रग्सचे मोठे सिंडिकेट उद्ध्वस्त केले आहे. या प्रकरणी दोन पोलीस कर्मचारी व एका कस्टम अधिकाऱ्यासह १० जणांना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून दोन लाख ७६ हजार रुपयांचा हायड्रो गांजासह एकूण ७३ लाख ९३ हजार ९३५ रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

या प्रकरणात आतापर्यंत मुख्य आरोपी कमल जयकिशन चंदवानी (वय ५६, रा. खारघर), कस्टम अधीक्षक प्रशांत विनोद गौर (वय ४०, रा. खारघर) पोलीस हवालदार सचिन बाबुराव भालेराव (वय ४०, रा. कामोठे), पोलीस नाईक संजय फुलकर (वय ३६, रा. खांदा कॉलनी), दोनवेळचा राष्ट्रीय हॉकीपटू सुजित बंगेरा (वय २८), आशिष रमेश गवारे (वय २२), अहमद खालेद ऑलगी (वय २३), साहिल शब्बीर लांबे (वय २८, तिघेही रा. नेरूळ), अंकित पितांबरभाई पटेल (वय ३७, रा. वाशी), रिकुंदरकुमार दिनेशभाई पटेल (वय ३९, रा. वाशी) यांना अटक झाली असून त्यांच्याकडून १६ लाख ४३ हजार रुपये किमतीचे अमली पदार्थ, १४ लाख १२ हजार ६५० रुपयांची रोकड व इतर असा एकूण ७३ लाख ९३ हजार ९३५ रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

नेरूळ सेक्टर १५ येथे हायड्रो गांजाच्या विक्रीची डील होत असल्याची माहिती मिळाल्यावर अमली पदार्थ विरोधी पथकाने १४ एप्रिल रोजी तेथे सापळा रचून छापा टाकला व कारवाई सुरू झाली. या प्रकरणात आणखी काही बडे मासे गळाला लागण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली असून त्यानुसार तपास सुरू आहे.

## राज्यात उष्णतेच्या लाटेचा इशारा

### विदर्भात मात्र पावसाचा अंदाज



**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यात उष्मा वाढला आहे. विदर्भ वगळता संपूर्ण महाराष्ट्रात प्रचंड उकाडा जाणवतोय. त्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. येत्या तीन दिवसांत मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात उष्णतेची लाट राहणार असून विदर्भात मात्र अवकाळी पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे.

सध्या उष्णतेचा चटका बसत असून कमाल तापमानाचा पारा वाढत जात आहे. विदर्भात मंगळवारी काही जिल्ह्यांना पावसाचा इशारा देण्यात आला असला तरी बहुतांश ठिकाणी तापमान ४० अंशांच्या पुढे राहिले. अकोल्यात आज ४४.५ अंश सेल्सियस, वाशिम ४२.४, यवतमाळ ४२.९, अमरावती ४२.८, तर नागपूर ४२.३ अंश सेल्सियसवर राहिले.

मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात उन्हाच्या झळांनी नागरिक बेजार झाले आहेत. पुण्यात मंगळवारी ४०.८ अंश सेल्सियस, तर सोलापुरात ४१.५ अंश तापमान होते. परभणीत सलग चौथ्या दिवशी तापमान ४२ अंशांच्या पुढे नोंदवले गेले.

कोकणासह मुंबई, उपनगर, ठाणे, पालघरमध्ये उष्ण व दमट हवामान आहे. येत्या तीन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात उष्णतेची लाट राहणार असून विदर्भात अवकाळी पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे. सध्या वातावरणात सातत्याने बदल होत असून वेगवेगळ्या घडामोडी घडत आहे.

## मुरूड किनारी जेलीफिशचा वावर



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड येथील समुद्रकिनारी ब्लू बटन जेलीफिश या समुद्री जीवाचा वावर दिसून येत आहे. त्यामुळे किनाऱ्यावर फेरफटका मारताना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मुरूडच्या अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्सच्या प्राणीशास्त्र विभागामार्फत ब्लू बटन जेलीफिशविषयी जनजागृती करण्यात येत आहे. हा मत्स्यवर्गीय जीव साधारण दोन ते तीन सेंमी व्यासाचा, निळसर रंगाचा व पारदर्शक पिशवीसारखा असतो. त्याचा स्पर्श झाल्यास त्वचेवर खाज, सूज, जळजळ आणि चट्टे निर्माण होतात. त्यामुळे या जेलीफिशपासून सुरक्षित अंतर राखण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

(सविस्तर वृत्त पान ५ वर)



# पहलगाम हल्ल्यावरून भारताने पाकिस्तानला सुनावले



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यावरून भारताने संयुक्त राष्ट्रांच्या बैठकीत पाकिस्तानला कठोर शब्दांत सुनावले आहे. भारताच्या युएन प्रतिनिधी योजना पटेल यांनी व्हिक्टिम्स ऑफ टेररिजम असोसिएशन नेटवर्क या संयुक्त राष्ट्राच्या उपक्रमासंदर्भातील बैठकीत पाकिस्तानला फैलावर घेतले.

या वेळी योजना पटेल यांनी पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी नुकत्याच केलेल्या एका जाहीर विधानाचा संदर्भ घेत म्हटले की, पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी 'दहशतवादी संघटनांना पाठिंबा देण्याचा, प्रशिक्षण देण्याचा आणि दहशतवादी कारवायांना आर्थिक पाठबळ देण्याचा पाकिस्तानचा इतिहास राहिला आहे', असे जाहीर मुलाखतीमध्ये मान्य केले आहे. ख्वाजा आसिफ यांची ही कबुली ऐकून कुणालाही आश्चर्य वाटले नाही. यातून पाकिस्तान जागतिक दहशतवादाला खतपाणी घालणारा आणि भारतीय उपखंडात अस्थैर्य निर्माण करणारा देश सिद्ध झाला आहे. जग याकडे आता दुर्लक्ष करू शकत नाही.

एका देशाच्या शिष्टमंडळाने या व्यासपीठाचा गैरवापर भारताविरुद्ध निराधार आरोप करून अपप्रचार पसरवण्यासाठी करणे दुर्दैवी आहे, असे म्हणत पटेल यांनी पाकिस्तानवर तोफ डागली.

### संयुक्त राष्ट्रांच्या बैठकीत जगभरातील देशांचे आभार

पहलगाम हल्ल्यानंतर भारताला पाठिंबा देणाऱ्या जगभरातील देशांचे या वेळी योजना पटेल यांनी आभार मानले. पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये २६/११च्या मुंबई हल्ल्यानंतर सर्वाधिक संख्येने सामान्य नागरिक मृत्युमुखी पडले आहेत. गेल्या अनेक दशकांपासून भारत हा सीमेपलीकडून होणाऱ्या दहशतवादी कारवायांचा बळी ठरला आहे. त्यामुळे अशा कारवायांनंतर मृतांच्या कुटुंबियांवर व समाजावर होणाऱ्या दूरगामी परिणामांची भारताला पूर्णकल्पना आहे. पहलगाम हल्ल्यानंतर जगभरातील देशांनी भारताला दिलेल्या पाठिंब्यावरून आंतरराष्ट्रीय समुदायाची दहशतवादासंदर्भातील कठोर भूमिका यातून स्पष्ट होतेय, असेही पटेल यांनी नमूद केले.

# 'आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्व यंत्रणांचा समन्वय आवश्यक'

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**



रायगड जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता मान्सून काळात येणाऱ्या पाऊस, पूर, वीज तसेच अन्य आपत्तींचे व्यवस्थापन करण्यासाठी सर्व यंत्रणांचा समन्वय आवश्यक आहे. आपत्ती काळात सर्व यंत्रणानी सतर्क व दक्ष रहावे, तसेच मान्सून पूर्व तयारी करताना सर्व बाबींची काटेकोरपणे तपासणी आणि उपाययोजना करावी असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले.

नियोजन भवन येथे जिल्हास्तरीय मान्सून पूर्व तयारी आढावा बैठक २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्र.पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जावळे म्हणाले, सर्व शासकीय यंत्रणानी अतिधोकादायक व धोक्याची संभावना असलेल्या ठिकाणांची पाहणी करावी. या ठिकाणच्या नागरिकांना मान्सून कालावधीमध्ये सुरक्षित जागी स्थलांतरीत करता यावे यासाठी निवाऱ्याची सज्ञता करावी. तसेच या काळात उपविभागीय अधिकारी, पोलीस अधिकारी व तहसीलदार यांनी उत्तम समन्वय राखत काम करावे.

नगरपालिका, महानगरपालिकांनी नालेसफाईची कामे ३१ मे पूर्वी पूर्ण करावीत. तसेच महाड शहरात दरवर्षी पूर परिस्थिती निर्माण होते. अशा पूरपरिस्थितीत मदत कार्य व बचावासाठी आवश्यक पूर्वतयारी व उपाययोजना केली जावी.सर्व शासकीय यंत्रणांनी आपदा मित्रांची बैठक घेऊन नियोजन करावे. आपत्तीच्या प्रसंगी रेल्वे, राष्ट्रीय महामार्ग आदी विभागांनी देखील नागरिकांच्या मदत व सुरक्षेच्या दृष्टीने पूर्वतयारी करावी.

सार्वजनिक बांधकाम विभागाने धोकादायक पूलांची तपासणी करून आवश्यक दुरुस्ती तात्काळ करावी व पर्यायी मार्ग सुस्थितीत ठेवावेत. तसेच रस्त्यावरील खडे, साईडपट्टी भरुन घेणे, रस्त्यावरील ब्लिंकर्स, बोर्ड, डायव्हर्शनचे बोर्ड, ब्लॅक स्पॉटवर रिफ्लेक्टर्स बसवावेत. सर्व विभागांकडील शोध व बचाव साहित्यांची दुरुस्ती करून सर्व साहित्य सुस्थितीत राहील, याची दक्षता घ्यावी. आवश्यक शोध व बचाव पथक, रुग्णवाहिका, स्थलांतराचे ठिकाण, अन्न पाण्याची व्यवस्था, जेसीबी मशिन्स, वूड कटर्स, बोट, लाईफ जॅकेट, स्पीड बोट, जनरेटर इ. साहित्य व मनुष्यबळ सर्व विभागांनी सज्ज ठेवावेत. पूर परिस्थितीमुळे रोगराई पसरुन साथरोगाचा धोका असतो. अशा ठिकाणी फवारणी करावी. पुरेसा औषधांचा साठा ठेवावा असे जिल्हाधिकारी जावळे यांनी सांगितले.

दुर्घटना ठिकाणी वैद्यकीय मदत तातडीने मिळण्याच्या दृष्टीने जिल्हा शल्य चिकित्सकांशी समन्वय राखून आरोग्य विभागास काम करण्याच्या सूचना श्री जावळे यांनी यावेळी दिल्या.

याचबरोबर अतिवृष्टीमध्ये नागरिकांनी धबधब्याच्या ठिकाणी, गडकिल्ले, धोकादायक ठिकाणी जावू नये. तसेच रायगड पाटबंधारे विभागाने धरणांची तातडीने तांत्रिक तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अतिवृष्टी विचारात घेवून टप्प्या-टप्याने धरणांतून विसर्ग करावा अशा सूचनाही जावळे यांनी केल्या. जिल्हा प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, तसेच या काळात पूर्व परवानगी शिवाय कुणीही मुख्यालय सोडू नये असे निर्देश ही त्यांनी यावेळी दिले.

## सिडकोच्या नियोजित प्रकल्पांची वरिष्ठांकडून पाहणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडकोतर्फे उत्तर नवी मुंबईतील तुर्भे ते दक्षिण नवी मुंबईतील खारघर नोडला थेट जोडण्यासाठी खारघर-तुर्भे टनेल लिंक रोड प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले आहे. सिडको गृहनिर्माण योजनेच्या या प्रकल्पांना सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी भेट दिली.

त्यांच्यासोबत सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनू गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. राजा दयानिधी, मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व विशेष



प्रकल्प) शीला करुणाकरण, अतिरिक्त मुख्य अभियंता प्रभाकर फुलारी, अधीक्षक अभियंता संतोष ओंभासे आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

जुईनगर रेल्वे स्थानकासमोरील शीव-पनवेल द्रुतगती महामार्गापासून ते खारघर येथील सेंट्रल पार्क उद्यानापर्यंत अंदाजे ५.४९० कि.मी. लांबीचा हा चार पदरी बोगदा मार्ग प्रस्तावित आहे. या ५.४९० कि.मी. लांबीच्या मार्गात १.७६३ कि.मी. लांबीच्या बोगद्याचा समावेश असणार आहे.

सिडकोतर्फे खारघर स्थानकाशेजारी परिवहन केंद्रित गृहनिर्माण योजना हाती घेण्यात आली आहे. या दौऱ्यात सिंघल यांनी या दोन्ही प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला आणि संबंधित अधिकाऱ्यांना काम अधिक वेगाने व ठराविक वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

## विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांच्या हस्ते १ मे रोजी ध्वजारोहण

**नवी मुंबई :** महाराष्ट्र राज्याच्या ६६ व्या स्थापना दिनानिमित्त कोकण विभागीय स्तरावरील शासकीय ध्वजारोहण गुरुवार दि.१ मे, २०२५ रोजी सकाळी ०८.०० वाजता विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांच्या हस्ते कळंबोली सेक्टर १७ येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर होणार आहे.

महाराष्ट्र राज्यच्या ६६ व्या स्थापना दिनाचा हा सोहळा सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करुन यशस्वीरित्या व उत्साहात साजरा होणार आहे. राष्ट्रध्वज वंदन व संचलन समारंभास नागरिक, पत्रकार, शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय पोषाखात उपस्थित राहावे. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने कृपया कोणतीही बॅग सोबत आणू नये, उन्हाची तीव्रता लक्षात घेता उपस्थितांनी आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पनवेल महानगरपालिकेकडून वृक्ष लागवड समितीची स्थापना

**पनवेल: रामप्रहर वृत्त**

'माझी वसुंधरा' अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पनवेल महानगरपालिकेने व्यापक वृक्षारोपण मोहिम हाती घेतली असून, शहरातील विविध ठिकाणी मोठ्या प्रमाणावर झाडे लावण्याचा निर्धार केला आहे. बदलत्या हवामानाचा परिणाम कमी करण्यासाठी आणि पर्यावरण संतुलन राखण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार आज मुख्यालयात अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकित वृक्ष लागवड समिती स्थापन करण्यात आली.

यावेळी उपायुक्त डॉ.वैभव विधाते, उपायुक्त स्वरूप खारगे, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, पाणी पुरवठा विभाग प्रमुख विलास चव्हाण, चारही प्रभागाचे प्रभाग अधिकारी, पर्यावरण विभागाचे विभाग प्रमुख मनोज चव्हाण, उद्यान विभागाचे अधिकारी, बांधकाम विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

आयुक्तांच्या निर्देशानूसार येत्या पावसाळ्यात महापालिका कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीची मोहिम राबविण्यात येणार आहे.या उपक्रमासाठी महापालिकेने विविध विभागांशी समन्वय साधत एक सुसंगत कृती आराखडा तयार केला आहे. यामध्ये विविध विभागांना



त्यांच्या कार्यक्षेत्रानुसार जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. या बैठकित विविध विभागाच्या उपायुक्तांनी सूचना सांगितल्या, या सूचनांप्रमाणे पुढील आठवड्यात प्रेझेंटेशन सादर करण्याबाबत उद्यान विभागास अतिरीक्त आयुक्तांनी सूचित केले. महापालिकेने सर्व संबंधित विभाग प्रमुख व अधिकाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्यांची यादी पाठवून कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे पुणे शहराच्या हरित पट्ट्याचा विस्तार होऊन पर्यावरणीय समतोल साधण्यास मदत होणार आहे.

### सोपविण्यात आलेली जबाबदारी

*जागा निवड (नगर रचना व उद्यान विभाग) : वृक्षारोपणासाठी योग्य जागांची निवड करणे, झाडांची निवड (पर्यावरण विभाग) : स्थानिक हवामान व मातीच्या गुणधर्मानुसार योग्य जातींची झाडे निवडणे. खड्डे खोदणे (बागायती विभाग) : झाडे लावण्यासाठी खड्ड्यांचे खोदकाम करणे, झाडे लावणे व देखभाल (उद्यान विभाग) : झाडे लावणे, कुंपण घालणे, संरक्षक व्यवस्था करणे आणि पाणी देण्याची जबाबदारी, नागरिक जनजागृती (पर्यावरण विभाग) : लोकांपर्यंत वृक्षारोपणाचे महत्त्व पोहोचवणे व सहभागासाठी प्रोत्साहित करणे. वृक्ष निधी (सीएसआर फंड विभाग व लेखा विभाग) : वृक्षारोपणासाठी निधी उभारणे व खर्चाचे व्यवस्थापन, पाण्याची तरतूद (पाणी पुरवठा विभाग) : लावलेल्या झाडांना नियमित पाणी मिळण्यासाठी उपाययोजना करणे*

## डिजिटल लर्निंग प्लॅटफॉर्म विथ स्मार्ट क्लासरूम

**पेण: प्रतिनिधी**

खेडचापाडचातील विद्यार्थ्यांना शहरातील मुलांसारखे उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे व त्यांनाही डिजिटल पॅनेलचा वापर करता यावा या हेतुने सीएफआय संस्थेचे संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सीएफआय रायगड युनिट व बीएनवाय मेलन यांच्या संयुक्त विद्यमाने पेण तालुक्यातील एकूण ८ शाळांमध्ये दोन वर्षापूर्वी डिजिटल लर्निंग प्लॅटफॉर्म विथ स्मार्ट क्लासरूम या उपक्रमांतर्गत डिजिटल पॅनल लावण्यात आले आहेत.

या उपक्रमाचा शाळेतील शिक्षक व विद्यार्थांना डिजिटल पॅनेलचा फायदाच झाल्याचे कळून आले. डिजिटल पॅनेलमुळे शिकवण्याच्या पद्धतीमध्ये बदल झाला आहे. डिजिटल पॅनेलमुळे आता एखादा घटक सहज व सोप्या पद्धतीने समजावता येतो. डिजिटल पॅनेलमुळे मुलांना अमूर्त कल्पना या समजावून सांगितल्यावर प्रत्यक्ष दाखवणे शक्य झाले आहे. शाळांमध्ये मुलांना युट्यूबद्वारे प्रक्टीकल्स तसेच अभ्यासक्रमा व्यतिरिक्त इतर गोष्टी शिकवल्या व दाखवल्या मुळे मुलांची शैक्षणिक प्रगती उंचावण्यास मदत होत आहे.



## निरामय हेल्थ फाऊंडेशन आणि गोदरेज एन्टरप्रायझेसच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य मेळावा

**चौक: प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील वडवळ(कुसावडे) येथे श्री जानाई-महाकाली देवी मंदिरात महिला मेळावाआयोजित करण्यात आला होता. वडवळ ग्रामपंचायतचे सरपंच ज्ञानेश्वर सुतार तसेच ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी सरपंच अविनाश आम्ले यांच्या उपस्थितीत हा मेळावा संपन्न झाला.

वडवळ ग्रामपंचायतचे माजी सरपंच जितेंद्र सकपाळ, सामाजिक कार्यकर्ते अशोक मरागजे, गोदरेज कंपनीचे सीएसआर प्रमुख तानाजी चव्हाण,फाउंडेशनच्या डायरेक्टर शुभलक्ष्मी पटवर्धन, संस्थेच्या सीईओ डॉ. क्षमा , ग्रामपंचायत



उपसरपंच सौ.प्रमिला मरागजे तसेच गावातील प्रतिष्ठित मान्यवर आणि महिला वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. निरामय संस्थेच्या सीईओ डॉक्टर क्षमा यांनी परिसरातील गावांमध्ये करत असलेल्या कामांची माहिती उपस्थित यांना दिली. त्यानंतर महिलांचा आरोग्यविषयक पैठणीचा कार्यक्रम आयोजित करुन त्या माध्यमातून विविध आरोग्य विषयी प्रश्न विचारून आरोग्याबद्दल जनजागृती करत महिलांना भेटवस्तू देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व महिलांमधून तीन नंबर काढून त्यांना मानाची पैठणी देण्यात आली

## महाराष्ट्र गौरव रथ यात्रेचे पोलादपूर येथे स्वागत

**पोलद्पूर : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र गौरव रथयात्राचे पोलादपूर येथे रायगड जिल्ह्यामध्ये स्वागत करण्यात आले.

याप्रसंगी बाप्पाजी सावंत, ॲड. आमरे, सुभाष केकाणे, बाबुशेठ खानविलकर, सुभाषशेठ निकम, राष्ट्रवादी काँग्रेस महाडच्या नेत्या स्नेहल जगताप कामत, धनंजय देशमुख, दिलीप भागवत, अजय सलागारे, तालुका अध्यक्ष विठोबा पार्टे, पोलादपूर शहर अध्यक्ष अजित खेडेकर यांच्यासह पोलादपूर नगरसेवक नगरसेविका तसेच तालुक्यातील प्रमुख कार्यकर्ते यांची उपस्थिती होती.

महाराष्ट्र गौरव रथयात्रेतील मंगल कलशाचे पूजन महाड विधानसभा नेत्या स्नेहल जगताप कामत यांच्या हस्ते करण्यात आले. तत्पूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला सर्व उपस्थित नेत्यांनी अभिवादन केले.



## मुंबईत भव्य व्यंगचित्र महोत्सव




**मुंबई : प्रतिनिधी**

कार्टूनिस्ट्स कंबाईन ही १९८३साली शिवसेना प्रमुख कै.बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना भवन येथे स्थापन केलेली अखिल भारतीय मराठी व्यंगचित्रकारांची संस्था. या संस्थे तर्फे दरवर्षी विविध शहरातून भव्य व्यंगचित्रकार संमेलने घेतली जातात. या वर्षी पाच आणि सहा मे रोजी होणार आहे सदर प्रदर्शन रसिकांसाठी विनामूल्य खुले आहे.

व्यंगचित्र प्रदर्शन, व्यंगचित्र स्पर्धा, व्यंगचित्र विषयक प्रशिक्षण देणारी नामवंत व्यंगचित्रकारांची प्रात्यक्षिकासह व्याख्याने, परिसंवाद असं या व्यंगचित्र संमेलनाचे स्वरूप असते. रसिकाना स्वतःचे कार्टून काढून घेण्याची संधीही या संमेलनात मिळणार आहे. जागतिक व्यंगचित्रकार दिना निमित्तया संमेलनाला शिवसेना नेते सुभाषजी देसाई यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

या व्यंगचित्रं प्रदर्शनात शंभर वर्षापूर्वीचीही दुर्मिळ व्यंगचित्रे पाहाण्याची संधी रसिकाना मिळणार आहे.या कार्यक्रमाचे आयोजन कार्टूनिस्ट्स कंबाईनचे अध्यक्ष संजय मिस्त्री, शिवसेना आमदार संजय पोतनीस, ओला वाकोलाचे संदेश चव्हाण यांनी केले आहे. पाच आणि सहा मे रोजी ओला वाकोला हॉल, सांताक्रूझ पूर्व येथे सकाळी दहा ते रात्री आठ वाजेपर्यंत रसिकांसाठी हे व्यंगचित्र प्रदर्शन विनामूल्य खुले आहे.

## निवडक

### अपघातामध्ये एक जखमी

**पनवेल :** जेएनपीटी ते पनवेल रोडवर रिलायन्स पेट्रोल पंपाजवळील रस्त्यावर टाटा टिगोर या गाडीचा टाटा ट्रेलर बरोबर झालेल्या अपघातात टाटा टिगोर गाडीचा चालक जखमी झाल्याची घटना घडली आहे. श्रीधर पाटील (वय ४५, रा.थळ) हे त्यांची टाटा टिगोर गाडी (एमएच-०६-सीडी-९४११) ही घेवून अलिबाग बाजूकडे जात असताना त्यांची गाडी जेएनपीटी ते पनवेल रोडवर रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ आली असता समोर खड्डा असल्याने त्यांनी त्यांची गाडी स्लो केली. दरम्यान, मागून येणारा टाटा ट्रेलर (एनएल-०१-एएफ-८४४८) वरील चालकाने त्यांच्या गाडीस पाठीमागून धडक दिल्याने झालेल्या अपघातात श्रीधर पाटील यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांच्या गाडीचेसुद्धा मोठे नुकसान झाले आहे. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात ट्रेलरचालक विकास यादव याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### इमारतीला आग लागून नुकसान

**पनवेल :** तळोजा फेज एक वसाहतीमधील इमारतीतील एका घरात लागलेल्या आगीत घरगुती साहित्य जळून खाक झाल्याची घटना घडली. ही आग घरातील वातानुकूलित यंत्रणेत शॉर्टसर्किटमुळे लागल्याचे खारघर अग्निशमन विभागाचे अधिकारी सौरभ पाटील यांनी सांगितले. तळोजा सेक्टर १२ मधील आर्चिड एन्क्लेव्ह सोसायटीच्या दुसर्या माळ्यावर तणवीर अलवारे हे कुटुंबासह वास्तव्य करीत आहेत. दरम्यान, बेडरूममधील वातानुकूलित यंत्रणेत शॉर्टसर्किटमुळे आग लागली. त्याचवेळी खिडकीतील पडदा आणि बाजूला असलेल्या लाकडी कपाटाने पेट घेतला. ही माहिती खारघर अग्निशमन केंद्राला मिळताच अग्निशमन जवानांनी तत्काळ घटनास्थळी पोहचून आग आटोक्यात आणली.

### मोफत संगीतोपचार केंद्र

**पनवेल :** गेल्या दोन वर्षांत आपल्या विविध उपक्रमांद्वारे पनवेलकरांच्या मनात स्थान मिळवलेल्या लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमतर्फे मोफत संगीतोपचार केंद्र सुरू करण्यात येणार आहे. सदर केंद्र ५०२, श्री गणेश अपार्टमेंट, सुश्रुषा रुग्णालयासमोर, पनवेल येथे सुरु होणार असून दर गुरुवारी संध्याकाळी ६ ते ८ या वेळात पूर्व नोंदणी करून नागरिकांना याचा लाभ घेता येईल. सदर केंद्राचे उद्घाटन बुधवार ३० एप्रिल रोजी सायंकाळी ठीक ५ वाजता गोखले सभागृह, पनवेल येथे आमदार प्रशांत ठाकूर यांचे हस्ते होणार असून या वेळी प्रांतपाल परमेश्वरन, प्रथम प्रांतपाल संजीव सुर्यवंशी, द्वितीय प्रांतपाल प्रवीण सरनाईक, विजय गणात्रा आणि इतर लायन पदाधिकारी आणि पनवेलमधील मान्यवर उपस्थित रहाणार आहेत. या वेळी पनवेलकर नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन सरगम क्लबच्या अध्यक्ष मानदा पंडित यांनी केले आहे.

# गुन्हेगारी प्रवृत्तीच्या घटनांमध्ये वाढ

## कळंबोलीत एका व्यक्तीवर प्राणघातक हल्ला

### दोन अल्पवयीन मुलासह दोघांना घेतले ताब्यात



**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली सेक्टर-८ मधील चर्चसमोर झोपलेल्या एका व्यक्तीवर चौघा तरुणांनी प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात ती व्यक्ती गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर एमजीएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर कळंबोली पोलिसांनी मारेकऱ्यांचा शोध घेऊन प्राणघातक हल्ला करणाऱ्या अल्पवयीन मुलासह दोघांना अटक केली आहे. पोलिसांनी आता फरार असलेल्या इतर दोघांचा शोध सुरू केला आहे. या घटनेतील जखमी व आरोपी हे सर्वजण नशा करणारे आहेत.

या घटनेत जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव संतोष फुलपगारे (वय ४०) असे असून तो फिरस्ता आहे. तो कळंबोली सेक्टर-८ मधील सेंट सॅबेस्टीयन चर्च समोरील भागात झोपला होता. त्यावेळी पहाटे ४.३० वाजण्याच्या सुमारास त्याठिकाणी दुचाकीवरुन आलेल्या चौघा आरोपीपैकी दीपक वसू याने संतोष फुलपगारे याला पाहून नशा करून चर्चच्या समोर झोपतात असे बोलून संतोषच्या डोक्यामध्ये दगड घालुन त्याला ठार मारण्याचा प्रयत्न केला. या वेळी जखमी संतोषने आरडा ओरड केल्यानंतर आरोपींना जखमी संतोषला मारहाणीबाबत कुणाला काहीही न सांगण्याबाबत धमकावून त्याठिकाणावरून पळ काढला.

या हल्ल्यात संतोष गंभीर जखमी झाल्याने त्या भागातील नागरीकांनी त्याला एमएमजीएम हॉस्पीटलमध्ये दाखल केले.

या घटनेची माहिती मिळाल्यानंतर कळंबोली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन चौघा मारेकऱ्यांविरोधात जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला. त्यानंतर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्हीच्या माध्यमातून आरोपींचा माग काढून त्यापैकी दीपक चौव्हाण व त्याचा अल्पवयीन साथीदार या दोघांना अटक केली आहे. पोलिसांनी आता फरार असलेल्या इतर दोघांचा शोध सुरू केला आहे.

## सोनसाखळी चोराकडून महिलेवर दगडफेक

**पनवेल : वार्ताहर**

सोनसाखळी चोरट्याने ५२ वर्षीय पादचारी महिलेच्या चेहऱ्यावर दगडाने हल्ला करून त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावून तेथून पसार झाला. ही घटना नवीन पनवेल उपनगरात सेक्टर १२ येथील रस्ता क्रमांक १ येथे घडली. चोरट्याने महिलेचे गळ्यातील ८३ हजार रुपयांची सोनसाखळी चोरी केल्याची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



नवीन पनवेल उपनगरातील सेक्टर १३मध्ये राहणाऱ्या नोकरदार महिला नारळ पाणी खरेदी करण्यासाठी सेक्टर १२ येथील रस्त्यावरून पायी चालत होत्या. अचानक त्या महिलेच्या पाठीमागून आलेल्या २२ वर्षीय तरुणाने महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावली, मात्र महिलेने गळ्यातील सोनसाखळी पकडून ठेवल्याने चोरट्याने जवळचा दगड उचलून त्या महिलेच्या चेहऱ्यावर दगडाने हल्ला केला. महिलेच्या चेहऱ्यावर दगड लागल्याने त्यांनी सोनसाखळीवरील हात सोडून जखमेवर ठेवला. तोपर्यंत चोरट्याने महिलेच्या गळ्यातील ३२ ग्रॅम वजनाची सोनसाखळी हिसकावून तेथून पळून गेला.

## भुयारी मार्गात तरुणीचा विनयभंग; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा येथील भुयारी मार्गातून पायी चालत जाणाऱ्या २२ वर्षीय तरुणीशी एका अज्ञात तरुणाने भुयारी मार्गामध्ये अश्लील चाळे करून तिचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. तळोजा पोलिसांनी या तरुणाचा शोध सुरू केला आहे.



या घटनेतील पीडित तरुणी मिरारोड येथे राहण्यास असून ती तळोजा येथे कामानिमित्त आली होती. सकाळी ९ वाजता पीडित तरुणी तळोजा पाचनंद रेल्वेस्थानकात उतरल्यानंतर भुयारी मार्गातून पायी चालत जात होती. रस्ता चुकल्याचा समज झाल्याने तिने एका तरुणाला तळोजा फेज-२ कडे जाण्याचा रस्ता विचारला. या वेळी तरुणाने पीडित तरुणीला रस्ता चुकल्याचे सांगितले. त्यानुसार तरुणी बाहेर जात असतांना, या तरुणाने मागून तरुणीला पकडून तिच्याशी अश्लील चाळे केले.

याबाबत तरुणीने आरडाओरडा केल्यावर आजूबाजूचे नागरिक तिच्या मदतीला धावून आले. दरम्यान, या घटनेतील आरोपी हा पसार झाला आहे.

## कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पनवेल शहर पोलिसांची पायी गस्त

**पनवेल : वार्ताहर**

कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या सतर्कतेच्या भूमिकेतून पनवेल शहर पोलिसांनी शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी पायी गस्त घालत अनेक बेकायदा व्यवसाय करणाऱ्यांची झाडाझडती घेतली.



पनवेलमध्ये मुख्य बाजारपेठ, जवेरी बाजार, वडाळे तलाव या ठिकाणी पाकीटमारी, फसवणुकीचे प्रकार किंवा वडाळे तलाव येथे बाईक रेसिंग आदी प्रकार घडत असतात. याच्या अनेक तक्रारी पनवेल शहर पोलीस ठाण्यात येताच त्याच पार्श्वभूमीवर या विकृतीकरणाला व गुन्हेगारांना आळा घालून कुठल्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यादृष्टीने पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे हे अधिक सतर्क असून त्यांनी आज सायंकाळी पनवेल शहरातील महत्त्वाच्या बाजारपेठा व गर्दीच्या ठिकाणी इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या साथीने पायी गस्त घालत रस्त्यावर बेकायदेशीर व्यवसाय करणारे परप्रांतीय, वाहतूक कोंडी करणारे वाहन चालक आदींच्या संदर्भात त्यांनी लक्ष घालून काहींवर कारवाई करून आवश्यक त्या सूचना दिल्या.

पनवेलकरांनी कोणतीही भिती न बाळगावी. पोलीस आपल्या सदैव रक्षणासाठी तत्पर असल्याचे तसेच कोणताही अनुचित प्रकार किंवा घटना घडल्यास त्यांनी त्वरित पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सुद्धा पायी गस्तीच्या माध्यमातून वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी केले आहे.

## लोकसेवा हक्क दिनानिमित्त एमएनआर शाळांमध्ये विविध स्पर्धा

### ८००हून अधिक विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकशाही हक्क अधिनियम २०१५च्या अंमलबजावणीस २८ एप्रिल रोजी पूर्ण झालेले दशक हे जनतेच्या हक्कांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेच्या वतीने 'लोकसेवा हक्क दिना'निमित्त विविध जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विशेषतः कामोठे येथील एमएनआर शाळांमध्ये भरवण्यात आलेल्या पोस्टर, निबंध आणि वक्तृत्व स्पर्धांना विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला.

महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. लोकसेवा हक्क दिन हा फक्त एक औपचारिकता न राहता विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणारा आणि लोकशाही प्रक्रियेचे महत्त्व समजावणारा ठरेल, यासाठी प्रशासनाने विशेष प्रयत्न केले.

कार्यक्रमाच्या वेळी सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार यांनी विद्यार्थ्यांना सेवा हक्क कायद्याचे मूलभूत तत्त्व समजावून सांगितले. त्यांनी स्पष्ट केले की, प्रत्येक नागरिकाला विशिष्ट कालावधीत शासकीय सेवा मिळण्याचा कायदेशीर अधिकार आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे सामान्य जनतेला अनेक सेवा अधिक पारदर्शक व वेळेवर मिळू लागल्या आहेत. विद्यार्थ्यांमध्ये याची जाणीव निर्माण करणे हा या स्पर्धांचा मुख्य उद्देश होता.

स्पर्धांमध्ये एकूण सुमारे ८०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पोस्टर स्पर्धेत विद्यार्थ्यांनी रंगीत कागदांवर विविध सामाजिक संदेश पोहचवणारी चित्रे रंगवली. निबंध स्पर्धेत 'लोकशाही आणि माझी जबाबदारी', 'सेवा हक्क कायदा: एक जनतेचा विजय' अशा विषयांवर विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. वक्तृत्व स्पर्धेत तर काही विद्यार्थ्यांनी इतक्या प्रभावी भाषणांची उदाहरणे दिली की उपस्थित शिक्षक आणि पालकांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे कौतुक केले.

या कार्यक्रमाची सांगता विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व बक्षीसं देऊन करण्यात आली. ही पारितोषिके सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार यांच्या हस्ते देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडून वाहत होता.

## पनवेल शहर पोलिसांची तृतीयपंथांवर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

गेल्या काही दिवसापासून तृतीयपंथांचा पनवेल परिसरात सुळसुळाट सुरु असून त्यांच्या त्रासाला कंटाळून अनेकांनी त्यांच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार आज तक्का परिसरात अशा प्रकारे फिरणाऱ्या तिघा तृतीयपंथींना पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या तृतीयपंथींच्या विरोधात जोरदार मोहिम सुरू असून शहरातील बाजारपेठा, सिग्नल, एसटी स्टॅण्ड, रेल्वे स्टेशन परिसर मोठ्या प्रमाणात तृतीयपंथी टोळक्याने फिरत असून नाहक सर्वसामान्य नागरिकांना त्रास देत त्यांच्याकडून पैसे उकळण्याचे काम करत आहेत. याबाबतच्या अनेक तक्रारी पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात येत आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने महिलांचा समावेश जास्त आहे. या तक्रारींच्या आधारे सदर कारवाई सुरू करण्यात आली असून पनवेल शहर पोलिसांनी तक्का परिसरात अशाच प्रकारे नागरिकांना त्रास देणाऱ्या तीन तृतीयपंथींना ताब्यात घेवून त्यांच्याविरोधात भादवी कलम १०२, ११२, ११७ अन्वये कारवाई केली आहे.

## 'सीकेटी'ची वैष्णवी शिंदे वक्तृत्व स्पर्धेत प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नागरी सेवा दिनानिमित्त पंचायत समिती पनवेल तर्फे (२६ एप्रिल) वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पनवेल परिसरातील अनेक शाळांनी सहभाग घेतला. विस्तार अधिकारी एन के गीते यांच्या प्रमुख उपस्थितीत ही स्पर्धा झाली. या स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यापैकी उच्च माध्यमिक विभागातील अकरावी सायन्स वर्गातील वैष्णवी नितीन शिंदे या विद्यार्थिनीने सर्वोत्कृष्ट सादरीकरण करून प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळविले.



पनवेल पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समीर वठारकर यांच्या हस्ते तिचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. वैष्णवीने मिळवलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुण शेठ भगत, सचिव डॉ. एस टी गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी तिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



उरण : दिवसेंदिवस उन्हाची दाहकता वाढत आहे. त्यामुळे या दिवसांत लिंबू सरबत पिण्याला नागरिकांचे प्राधान्य असते. त्यामुळे जागोजागी सरबत विक्रते असून तेथे नागरिकांची गर्दी असते.



## संपादकीय

# अश्लीलता रोखली जावी

ओटीटीवरील अश्लीलतेला अटकाव करण्याचा विषय निघताच, काय अश्लील हे कोण आणि कसे ठरवणार हा वाद पुन्हा सुरू होऊ शकतो. अश्लीलतेवर मर्यादा घालताना अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे अशी मागणीही होईल. हा सगळा तोल सांभाळूनच ओटीटीवरील कंटेंटचे नियंत्रण करावे लागेल.

**ओटीटी तसेच सोशल मीडियावर दाखवण्यात येणाऱ्या अश्लील आणि आक्षेपार्ह बाबींविषयी सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी चिंता व्यक्त केली. याबाबत उपाय करण्याचे काम संसद किंवा सरकारचे आहे असे सांगत न्यायालयाने याबाबत सरकारकडून उत्तर मागितले. आक्षेपार्ह अश्लील कंटेंट ओटीटीवरून दाखवले जाते हे जगजाहीर असून आपल्याकडे अनेकांना ते खटकते आहे. सरकारलाही त्याची कल्पना असून यापूर्वीही यासंदर्भात काही नियम अस्तित्वात आले आहेत. आणखी नियम आणण्याचे विचाराधीन आहे अशी माहिती महान्यायअभिकर्ता तुषार मेहता यांनी सरकारच्या वतीने सर्वोच्च न्यायालयाला दिली. काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध युट्यूबर रणबीर अलाहाबादिया याने एका कार्यक्रमात केलेल्या अश्लील टिप्पणीवरून देशभरात गदारोळ झाला होता. त्यावरून सोशल मीडियावर कशाप्रकारचा कंटेंट दाखवला जातो याची कल्पना यावी. अनेकदा या कंटेंटमधील अश्लीलता विकृतीच्या पातळीवर जाते हेही दिसून आले आहे. याच बाबींविषयी गंभीर चिंता व्यक्त करणारी व अशा कटेंटवर बंदी घालण्यासाठी केंद्र सरकारला योग्य पावले उचलण्याचे निर्देश द्यावेत अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयासमोर सुनावणीला आली. तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने सरकारसोबतच निरनिराळ्या ओटीटी प्लॅटफॉर्म्सनाही नोटिसा बजावल्या व यासंदर्भात उत्तर देण्यास सांगितले. ओटीटीवरील अश्लील कंटेंटवर बंदी घालण्यासाठी 'नॅशनल कंटेंट कंट्रोल थॉरिटी'ची स्थापना करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करावीत असेही याचिकेत म्हटले आहे. याचिकेतील चिंता वास्तवच आहे. आता अगदी लहान वयाच्या मुलांच्याही हातात मोबाइल सहज पडतो. कोविड महामारी दरम्यान शाळा बंद झाल्याने ऑनलाइन शिक्षणाकरिता मोबाइल गरज बनला आणि तेव्हा शैक्षणिक गरजेतून मुलांच्या हाती पडलेला मोबाइल काढून घेण्याचे भान पालकांना फारसे राहिलेले दिसत नाही. मुलांनी त्रास देऊ नये, शांत एका जागी बसून रहावे म्हणून मुलांच्या हाती मोबाइल देणारे पालक मूल कुठल्या कंटेंटकडे वळते याकडे बारकाईने नजर मात्र ठेवत नाहीत. ओटीटीवरील बहुतेक वेबसीरीज या संपूर्ण कुटुंबाने एकत्र बसून पहाव्यात अशा नसतात. महानगरांमध्ये समाजाच्या खालच्या स्तरात जेमतेम एका खोलीच्या घरांमध्ये खाजगीपणा शक्यही नसतो. लहान वयात अश्लील कंटेंट नजरेस पडल्यास मुलांच्या मानसिकतेवर त्याचे गंभीर परिणाम संभवतात. त्यांच्या एकंदर व्यक्तिमत्वावर, लैंगिक दृष्टिकोन व वर्तनावर त्याचा खोलवर प्रभाव पडतो. अश्लील कंटेंटमध्ये मुलांचा समावेश असलेले चाइल्ड पॉर्नही असते. त्याचे दुष्परिणाम तर एकंदर समाजातच दिसत आहेत. अठरा वर्षे वयावरील प्रेक्षकांसाठीचे कंटेंट असे काही मोबाइलच्या सुळसुळाटामुळे आता पाळले जाताना दिसत नाही. त्यामुळेच एकंदरच या कंटेंटमधील अश्लीलतेवर काही निर्बंध असावेत अशी मागणी होते आहे. या अशा कुठलेही निर्बंध नसलेल्या अश्लील आणि आक्षेपार्ह कंटेंटचा आपल्या सामाजिक मूल्यांवर, मानसिक आरोग्यावर आणि सामाजिक सुरक्षेवरही गंभीर परिणाम होऊ शकतो. स्त्रिया तसेच मुलांवरील लैंगिक हल्ल्यांचे व लैंगिक शोषणाचे प्रमाण वाढताना दिसत आहे. तसेच अनैसर्गिक लैंगिक प्रवृत्तींना चालना मिळत असून गुन्हेगारी वाढते आहे. त्यामुळेही या आक्षेपार्ह कंटेंटला अटकाव करण्याची गरज भासू लागली आहे.**

# भूमापन ते डिजिटल नकाशा

कोकण विभागातील भूमि अभिलेख विभागाची १०० मुख्यमंत्री कृति आराखडा अंतर्गत आदर्श कामगिरी केली आहे. भूमापन ते डिजिटल नकाशांपर्यंत सर्वांगीण यश मिळाले आहे

महाराष्ट्र शासनाच्या १०० मुख्यमंत्री कृति आराखडा या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत कोकण विभागातील भूमि अभिलेख विभागाने भू–व्यवस्थापनाच्या विविध घटकांमध्ये भरीव कार्य करत एक आदर्श निर्माण केला आहे. भूप्रणाम केंद्रे, स्वामित्व योजना, ई–अभिलेख अंतर्गत बल्क साईन प्रकल्प, डिजिटाईज नकाशे आणि आकारबंद प्रकरणांवर विभागाने केलेल्या कामांची दखल राज्य पातळीवर घेतली जात आहे.

१.डिजिटल मोजणी आणि 'क' प्रत ऑनलाईन–भूमि अभिलेख विभागाने जमिनीच्या मोजणी प्रक्रियेत सुधारणा करत 'ई–मोजणी २.१' प्रणाली लागू केली आहे. या प्रणालीद्वारे नागरिकांना १०० दिवसात विभागात ७८४८ (८३.१३%) मोजणी नकाशे अक्षांश–रेखांशासह क प्रत ऑनलाईन स्वरूपात जनतेला उपलब्ध करून देणेत आल्या आहेत, ज्यामुळे मोजणी प्रक्रियेत पारदर्शकता आणि अचूकता वाढणार आहे

भूमी अभिलेख विभागाचे नवीन पोर्टल https://bhumiabhilekh.maharashtra.gov.in/राज्य सरकारने भूमी अभिलेख विभागाचे पोर्टल अद्ययावत केले असून, यामध्ये १७ विविध सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या आहेत. या सुविधांमध्ये ७/१२ उतारा, ८अ उतारा, फेरफार नोंदणी, ई–नकाशा, ई–मोजणी अभिलेख, जमीन महसूल भरणा, ई–पिक पाहणी इत्यादींचा समावेश आहे .

भूप्रणाम केंद्र – नागरिकांना भू–सेवांसाठी एकाच ठिकाणी सर्व सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी विभागात ८ तालुक्यात भूप्रणाम केंद्रांची स्थापना करण्यात आली.

७/१२ उतारा, फेरफार, मोजणी अहवाल, नकाशे, आकारबंदी आदेश यांसारख्या सेवांसाठी वन–स्टॉप सोल्यूशन.

अनेक तालुक्यांमध्ये नवीन भूप्रणाम केंद्रे कार्यान्वित करण्यात आली असून, नागरिकांची कार्यालयीन पायपीट लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. स्वामित्व योजना –केंद्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली



ड्रोनच्या साहाय्याने गावठाण क्षेत्राचे मोजमाप व मालकी प्रमाणपत्र वाटप यशस्वीपणे पूर्ण.

गावठाणातील रहिवाशांना प्रथमच अधिकृत मालकीचा दस्त मिळाल्याने बँक कर्ज, विक्री व्यवहार यास चालना मिळाली.

कोकण विभागात १८८४२ सनदा /प्रमाणपत्र गावांमध्ये वाटप यशस्वीरित्या वाटप करण्यात आले

**बल्क साईन प्रणाली:**

भूमी अभिलेख विभागाने ४७९४१८८ जुने अभिलेख दस्तांची ई–अभिलेख अंतर्गत ऑटोमेटेड डिजिटल स्वाक्षरी प्रणालीद्वारे स्वाक्षरी केली असून कार्यप्रवाह गतीमान.

अधिकारी वर्गाची श्रमबचत आणि दस्तांची प्रमाणिकता सुनिश्चित.

**डिजिटाईज नकाशे:**

विभागाने सर्व तालुक्यातील सर्व नकाश्यांचे स्कॅनिंग पूर्ण करून डिजिटायझेशन ते GIS आधारित प्रणालीत समाविष्ट करणेचे काम प्रगतीत आहे

नागरिकांना त्यांच्या जमिनीचे नकाशे ऑनलाइन मिळवणे शक्य झाले असून, फेरमोजणी आणि सीमाभांडे प्रकरणांमध्ये अचूकता.

समुद्र किनारी असलेली महसूली गाव नकाशाची अंतिम सीमा रेषा ते समुद्राच्या उच्चतम भरती रेषा या दरम्यान जमिनी काम –राज्यातील किनाऱ्यालगत महसुली गावांच्या अंतीम हद्दी व त्या हद्दीपासून समुद्राच्या / खाडीच्या उच्चतम भरती रेषा यामधील तयार झालेल्या जमिनी परंतु अद्याप सर्वेक्षण होऊन मोजणी अंती महसूल दप्तर तयार न झालेल्या अशा जमिनींचे सर्वेक्षण, मोजणी व वापराच्या धोरणाबाबतचे काम प्रगतीत आहे .

ईप्सित प्रणाली– भूमि अभिलेख विभागाने फेरफार नोंदीकरीता ऑनलाईन



ईप्सित प्रणाली विकसित केली असून त्याद्वारे अर्जदार कार्यालयात न येता सर्व प्रकारच्या फेरफार नोंदीकरीता ऑनलाईन अर्ज दाखल करू शकतील. त्याकरीता अर्जदार यांना कार्यालयात हेलपाटे मारावे लागणार नाही.


प्रत्यय प्रणाली - प्रत्यय प्रणालीमुळे विभागाकडे अपील दाखल करू ईच्छीणा–या अपीलदार यांना घरबसल्या ऑनलाईन अपील प्रकरण दाखल करता येणार असून सुनावणीच्या नोटीसा अपील अर्जदार यांना ऑनलाईन प्राप्त होणार आहेत. याकामी अपील अर्जदार यांना कार्यालयात हेलपाटे मारावे लागणार नाही. तसेच संबंधीत अपील प्रकरणाची सद्यस्थिती अपील अर्जदार यांना ऑनलाईन समजू शकेल.

कार्यालय प्रमुख यांच्या भेटीची वेळ –उपसंचालक भूमि अभिलेख कोंकण प्रदेश मुंबई यांना भेटीसाठी इच्छुक नागरिक, कर्मचारी व संबंधित अधिकाऱ्यांसाठी भेटीची वेळ सोमवारी व मंगळवार दुपारी ३ ते ५ निश्चित करण्यात आली असुन या वेळेत कार्यालय प्रमुख यांच्याशी थेट संवाद साधता येणार आहे.

यावेळी नागरिकांना त्यांच्या समस्या, शंका, तक्रारी व सूचना थेट कार्यालय प्रमुखांपर्यंत पोहोचवता येणार आहेत. कार्यालयीन कारभारात पारदर्शकता आणणे, निर्णय प्रक्रियेला गती देणे व सेवा सुधारण्याच्या दृष्टीने ही भेटीची वेळ अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

लोकांच्या प्रश्नांची उत्तरे देणे व त्यांच्या अडचणी दूर करणे हेच आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यामुळे नागरिकांनी सजगतेने आणि सकारात्मक दृष्टिकोनाने भेटीसाठी पुढे यावे.

नवीन तंत्रज्ञान आणि डिजिटल साधनांच्या मदतीने आम्ही भूसेवा क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडवले आहेत. आमचे उद्दिष्ट म्हणजे प्रत्येक नागरिकाला अचूक, जलद आणि पारदर्शक सेवा देणे आहे असे उपसंचालक भूमि अभिलेख कोंकण प्रदेश मुंबई अनिल माने यांनी सांगितले.




# या टिप्स फॉलो केल्यास कमी येईल वीजबिल

उन्हाचा तडाखा वाढू लागला आहे. कडक उन्हापासून वाचण्यासाठी लोक दुपारच्या वेळी घराबाहेर पडणे टाळताना दिसतात. अशा स्थितीत वीज बिलात वाढ होणे स्वाभाविक आहे. उन्हाळ्यात एसी आणि कूलरच्या अधिक वापरामुळे वीज बिलात वाढ होते. त्यामुळे खिशावरचा आर्थिक भार वाढतो..रोजच्या वापरात काही बेसिक गोष्टींची काळजी घेतली तर लाईटबिल जास्त येणारच नाही आणि विजेचीही बचत होईल.



तुम्ही खोलीच्या बाहेर निघता तेव्हा लाईट किंवा इतर इलेक्ट्रोनिक्सच्या वस्तू बंद करायला विसरू नका. फोन चार्जर, लॅपटॉप या डिव्हाईसचा वापर होत नसेल आणि स्विच ऑन असेल तरीही बील येत जातं. म्हणून वापर झाल्यानंतर बटन्स बंद करायला विसरू नका. चार्जिंग झाल्यानंतर बटन्स न विसरता बंद करा.

एलईडी लाईट बल्ब ट्रेडिशनल बल्बच्या तुलनेत विजेची बचत करतात. ज्यामुळे लाईटबील कमी येते आणि दीर्घकाळ चालतात

जेव्हा ऊन्हाळा सुरू होतो तेव्हा एसी, कुलरची गरज लागतेच. अशावेळी लाईटबील खूप जास्त येऊशकतं. अशावेळी तुम्हाला लाईटबील कमी करण्यासाठी काही सोप्या ट्रिक्स फॉलो कराव्या लागतील जसं की २४ डिग्रीवर एसी सुरू ठेवा. जेणेकरून वेळोवेळी ऑफ होत राहील.

एसीच्या टेम्परेचरकडे लक्ष द्याउन्हाळ्यात एसीचे टेम्परेचर नेहमी २४ ते २६ अंश सेल्सिअस ठेवावे. त्यामुळे कूलिंग चांगल्या प्रकारे होते आणि जास्त वीजही लागत नाही. 'लक्षात ठेवा टेम्परेचर जितके कमी कराल तितकी वीज जास्त वापरली जाईल आणि बिल जास्त येईल. त्यामुळे तुम्ही चांगल्या परिणामांसाठी टायमर सेट करू शकता. आपल्या घरातील जुन्या वस्तू अपग्रेड करून तुम्ही जवळपास ४० टक्के वीज वाचवू शकता. जर तुम्ही साधारण फ्रिजऐवजी ५ स्टार रेटेड फ्रिजची निवड केली तर विजेचे बील ३० टक्क्यांनी कमी होईल. जुन्या फ्रिजमध्ये वारंवार प्रोब्लेम्स उद्भवतात कधी जास्त बर्फ तयार होतो तर कधी कुलिंग व्यवस्थित होत नाही अशावेळी तुम्ही नवीन फ्रिज घेण्याचा विचार केलात तर पैसे आणि वीज दोन्हींची बचत होईल.

# संगीतकार श्रीनिवास खळे

ज्या अवीट गोडीच्या चालींनी मराठी भावजीवनाच्या पाच पिढ्या समृद्ध केल्या, त्यात सर्वात मोठा वाटा पं. श्रीनिवास खळे यांच्या सुरावटीचा आहे. खळेबुवांच्या हार्मोनियममधून निघालेल्या सुश्राव्य चालींनी मराठी माणसाला बेधुंद केले. त्यांचे संगीत लाभलेली गीते अजरामर झाली. १९५० साली रेल्वेतील नोकरीचा आलेला कॉल अजून आलाच नाही असं खोटं सांगत खळयांनी वडिलांना फसवलं नसतं तर आपण या श्रीनिवास खळे नामक संगीतातील दैवी चमत्काराला मुकलो असतो!

खळे यांचा जन्म गुजरातेतील बडोद्याचा. ३० एप्रिल १९२६चा. महाराज सयाजीराव गायकवाडांचे उत्तेजन आणि प्रोत्साहनामुळे बडोदे शहरातील वातावरण कला–संस्कृतीला पोषक होते. खळे यांनीही आपल्या संगीतशिक्षणाची सुरुवात नावाजलेल्या महाराज सयाजीराव गायकवाड संगीत महाविद्यालयातून केली. पंडित मधुसूदन जोशींच्या निगराणीखाली संगीताचे प्राथमिक धडे गिरवल्यानंतर उर्वरित शिक्षण त्यांनी अता हुसेनखाँ, निसार हुसेनखाँ आणि फय्याज हुसेनखाँ या गुरूंजवळ राहून पूर्ण केले. संगीतक्षेत्रात स्वतंत्रपणे काही घडवून दाखवण्याची ऊर्मी त्यांना



**निमित्त**

स्वस्थ बसून देत नव्हती. त्यामुळे बडोदा आकाशवाणीतील संगीतकाराची नोकरी सोडून ते मुंबईत आले. एका चित्रपटाच्या संगीत दिग्दर्शनाची संधीही त्यांना मिळाली. पण, दुर्दैवाने तो प्रकल्प पूर्णत्वाला गेला नाही. त्यामुळे वैफल्यग्रस्त झालेल्या खळेंनी हार्मोनियम विकून नवी नोकरी शोधावी, अशी मनाशी खूणगाठ बांधली होती. पण, पत्नीने दिलेल्या धीराने त्यांनी पुन्हा एकदा आयुष्यावरील अपयशाचा डाग धुऊन काढण्यासाठी परिस्थितीशी झगडण्याचे ठरवले. गायकाच्या गायकीतील सामर्थ्यस्थळे ओळखून त्याप्रमाणे त्यांना गायला लावण्यात खळे माहीर होते. लता मंगेशकर यांच्या आवाजातील संत तुकारामांचे अभंग, 'गोरी गोरी पान फुलासारखी छान', 'या चिमण्यांनो! परत फिरा रे', 'बगळ्यांची माळ फुले', 'शुक्रतारा', 'जेव्हा तुझ्या बटांना उधळी मुजोर वारा', 'लाजून ते हासणे अन् हासून ते पहाणे' यांसारखी भावविभोर गाणी, शांता शेळके यांची अवखळ, खट्याळ अणि लडिवाळ बालगीते आणि महाराष्ट्रगीते मराठीच्या सांस्कृतिक संचिताचा अविभाज्य भाग झाली आहेत. १ मे १९६० रोजी यशवंतराव चव्हाण संयुक्त महाराष्ट्राचा कलश घेऊन येणार ही बातमी आल्यावर एच. एम. व्ही. कंपनीने चार दिवसांत महाराष्ट्राची दोन गीत करा असे खळयांना सांगितले. त्यातूनच जन्माला आली शाहिर साबळेंनी गायलेली राजा बडे लिखीत 'गर्जा महाराष्ट्र माझा' व चकोर आजगांवकर लिखीत 'माझे राष्ट्र महान'. ही स्फूर्ती गीतं आज महाराष्ट्रात अनेक कार्यक्रमात आग्रहाने गायली जातात संगीतक्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना सूरसिंगार, लता मंगेशकर, जीवनगौरव, संगीतरत्न अशा पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. भारत सरकारने मागील वर्षी पद्मभूषण पुरस्कार प्रदान करून या संगीतयोग्याला मानाचा मुजरा केला.२ सप्टेंबर २०११ रोजी त्यांच्या निधनाने महाराष्ट्राने दीर्घकाळ जपून ठेवलेले सूरनिधान अस्तंगत झाले आहे.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# उन्हाळ्यात कोल्ड्रिंक्स नाही, ही १० देशी पेये प्या

उन्हाळ्यात सर्वांनाच तहान लागते, पण कोल्ड्रिंक्स, पॅक केलेला ज्यूस पिणे किंवा आईस्क्रीम खाणे हे आरोग्यदायी पर्याय नाहीत. त्याऐवजी, जर तुम्ही सत्तू, बेल शरबत, ताक किंवा लिंबूपाणी यासारखे नैसर्गिक आणि देशी पर्याय स्वीकारले तर शरीर थंड तर राहीलच, पण तुमची रोगप्रतिकारक शक्ती आणि पचनसंस्थादेखील निरोगी राहील.



उन्हाळ्याच्या काळात घामाद्वारे शरीरातून भरपूर पाणी आणि खनिजे बाहेर पडतात. यामुळे डिहायड्रेशन आणि उष्माघातासारख्या समस्या उद्भवू शकतात. म्हणूनच अशा पेयांची गरज आहे, जी केवळ तहान भागवत नाही तर शरीराला थंडावाही देतात, पचन सुधारतात आणि आवश्यक इलेक्ट्रोलाइट्स पुन्हा भरतात.अशी दहा देशी पेये –

१ सत्तू शरबतमध्ये देशी प्रथिने आढळतात. सत्तूमध्ये थंडावा असतो.

२. बेलाचा रस पोटाला आराम देतो. याचा थंडावा देणारा प्रभाव असतो आणि पचनसंस्थेला शांत करतो.

३. ताक आणि लस्सी पचनक्रियेत मदत करतात.ताकात हे पचन सुधारते आणि उष्णतेचा थकवा दूर करते

४. नारळाच्या पाण्यात इलेक्ट्रोलाइट्स भरपूर असतात. ते शरीराला त्वरित हायड्रेट करते, खनिजे भरून काढते आणि थकवा दूर करते.

५. खसखस सिरपमध्ये थंडपणा आणि सुगंध दोन्ही असतात.शरीराला थंडावा देण्यासोबतच,

६. ऊसाचा रस हा ऊर्जा वाढवणारा आणि यकृताचा मित्र आहे.हे शरीरातील ग्लुकोजची पातळी संतुलित करते

७. आंब्याचे पन्ह हे उन्हाळ्याचे सुपरड्रिंक आहे. उष्माघातापासून संरक्षण करते

८. लिंबू पाणी हे एक डिटॉक्स आणि थंड पेय आहे. व्हिटॅमिन सी मिळते.


९. जलजीराचे पाणी पोटाला थंडावा देते.जलाजीरा भूक वाढवते, उन्हाळ्यात गॅस–ॲसिडिटी दूर करते.

१०. टरबूजाचा रस परिपूर्ण थंडावा देतो.९०% पाणी असलेले टरबूज शरीराला हायड्रेट करते. त्यात व्हिटॅमिन ए, सी आणि अँटीऑक्सिडंट्स असतात.

# मुरुड किनाऱ्यावर जेलीफिशचा वावर; सावधगिरी बाळगण्याचे आवाहन

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड जंजिरा समुद्रकिनारी 'ब्लू बटन जेलीफिश' या निळसर रंगाच्या आकर्षक परंतु संवेदनशील समुद्री जीवामुळे पर्यटकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असली, तरी या जीवाशी संपर्क साधणे आरोग्याच्या दृष्टिकोनातून धोकादायक ठरू शकते. अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड मधील प्राणिशास्त्र विभागामार्फत या 'ब्लू बटन जेलीफिश' विषयी जनजागृती करण्याचे काम करण्यात येत आहे.



पावसाळयात समुद्रकिनाऱ्यावरील जैवविविधता अनुभवण्याची संधी मिळते, मात्र त्याचबरोबर काही जीव, जसे की ब्लू बटन जेलीफिश, यांच्यामुळे धोका निर्माण होऊ शकतो. पर्यटकांनी नैसर्गिक सौंदर्याचा आनंद घेताना सावधगिरी आणि जागरूकता बाळगणे अत्यावश्यक आहे. मुले आणि पर्यटकांनी विशेष खबरदारी घ्यावी, कारण हे जीव फारच आकर्षक वाटतात.असे आवाहन अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड मधील प्राणिशास्त्र विभागाचे प्रा. जावेद खान, प्रा. अल्ताफ फकीर व महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. साजिद शेख यांनी केले आहे.

किनाऱ्यावर फेरफटका मारताना अशा जेलीफिशपासून सुरक्षित अंतर ठेवा. चुकून संपर्क झाल्यास, प्रभावित भाग समुद्राच्या पाण्याने ताबडतोब धुवावा.बर्फाचा शेक द्या आणि लक्षणे तीव्र असतील तर तत्काळ वैद्यकीय उपचार घ्या..

### ब्लू बटन जेलीफिशविषयी अधिक माहिती

***वैज्ञानिक नाव: पोरपीटा पोरपीटा प्रकार: खरा जेलीफिश नसून, हायड्रॉझोअन पॉलिप्सच्या वसाहतींचा समूह आकार व रंग: साधारण २-३ सें.मी. व्यासाचा, निळसर रंगाचा, पारदर्शक पिशवीसारखा दिसतो वास्तव्य: उष्णकटिबंधीय आणि उप उष्णकटिबंधीय समुद्रातील पृष्ठभागावर तरंगतो धोका: आकर्षक दिसतो, पण स्पर्श झाल्यास त्वचेवर खाज, सूज, जळजळ आणि चट्टे निर्माण होतात.***

# रोह्यातील प्रश्नांसंबंधी भाजयुमोकडून पाहणी

**धाटाव : प्रतिनिधी**

भाजप युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस रोशन चाफेकर यांच्या पुढाकाराने भारतीय जनता युवा मोर्चाने रोहातील विविध विषयांवर नगरपालिकेच्या अधिकार्यांची भेट घेऊन निवेदन दिले व प्रत्यक्षात पाहणी केली.

रोहा शहरातील दमखाडी येथील जयराम अपार्टमेंट समोरील अंडरग्राउंड नाल्याचे पाणी गेल्या दोन ते तीन दिवसापासून बाहेर येत आहे. यासंदर्भात अधिकारी वर्गासोबत जागेवर जाऊन चर्चा केली. नगरपालिकेकडून यासंदर्भात उपाययोजना करण्याचे प्रयत्नही झाले. मात्र अजून प्रश्न सुटलेला नाही.



पंपच्या साहाय्याने गटारमधील घाण बाहेर काढणार असुन,पाईप लिकेज असल्यास त्यावर उपाययोजना करणार असल्याचे अधिकारी यांनी सांगितले.

यासंदर्भात तेथील रहिवासी व येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांच्या तक्रार आल्यानंतर रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग यांच्या सल्ल्याने भारतीय जनता युवा मोर्चाकडून पाहणी करून निवेदन देण्यात आले. रोहा शहरातील मंगलवाडी येथील मधुसूदन अपार्टमेंट समोरील पाणी सोडण्याच्या वॉल्वच्या बाजूने चांगले चेंबर करणे गरजेचे आहे तसेच तेथील खड्ड्यामध्ये कोणीही पडून अपघात होणार नाही यासंदर्भात उपाययोजना करण्याचे करावे असे सांगितले.

प्रभाग क्रमांक ९ मधील गटारे स्वच्छता बाबत सुद्धा पाहणी केली. यावेळी प्लास्टिकचे प्रमाण अधिक असून प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती आवश्यक असल्याचे लक्षात आले. भाजप युवा वॉरियर्सचे जिल्हा संयोजक वैभव कुलकर्णी तसेच युवा मोर्चा शहर अध्यक्ष अनिल घरजाळे या पाहणी आणि चर्चेदरम्यान उपस्थित होते.

नगरपालिका अधिकारी पुळेकर यांच्या सोबत प्रत्यक्ष पाहणी करताना त्यांनी चांगली माहिती दिली व लवकरात लवकर सदर प्रश्न मार्गी लागतील असे आश्वासन दिले.

# आदिवासींना उपजीविकेच्या साधनांचे वाटप

**पोलादपूर : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील खैरे आदिवासी मच्छीमार विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित खैरे, जननीदेवी आदिवासी मच्छीमार विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित आंबवडे, आदिवासी कातकरी मच्छीमार विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित वरंध या ३ सहकारी संस्थेच्या १७४ आदिवासी कातकरी मच्छीमार लाभार्थींना महानगर गॅस लिमिटेड मुंबई (सीएसआर) कंपनीकडून अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात आले. यासाठी शबरी विकास महामंडळाने प्रयत्न करून दिले.



श्रमजीवी जनता सहाय्यक मंडळाच्या तांत्रिक मार्गदर्शनाने आदिवासी समाजाचा हा प्रकल्प श्रमजीवी संस्थेचे महाड शाखेचे प्रकल्प व्यवस्थापक विठ्ठल कोळेकर यांनी अथक परिश्रम घेऊन यशस्वीरित्या पूर्ण केला, असे शबरी विकास महामंडळाचे अधिकारी मनोहर मोहिते यांनी उपस्थित महानगर गॅस कंपनीचे अधिकारी व व्यासपीठावरील मान्यवरांना आवर्जून सांगितले.

आदिवासी कातकरी बांधवांना देण्यात आलेल्या वस्तूंमध्ये तलावात पिंजरा पद्धतीने मत्स्यसंवर्धन , मासेमारीसाठी सूतजाळी, फायबर बोट , शितपेटी, मत्स्यबीज, मत्स्यबीज, मत्स्यखाद्य इत्यादी वस्तुंची उपलब्धता करून देण्यात आली.

याप्रसंगी महानगर गॅस कंपनीचे अधिकारी एचआर आणि सीएसआर डिपार्टमेंटचे व्हाइस प्रेसिडेंट आत्मकुर चक्रपाणी, ओअँडएम डिपार्टमेंटचे व्हाइस प्रेसिडेंट शितांशू रायचौधरी, सीएसआर डिपार्टमेंटचे हेड सुशांताकुमार राऊत, सीएसआर असिस्टंट मॅनेजर सौ.प्रियांका दळवी, दीपिका शिवकुमार शबरी विकास महामंडळाचे अधिकारी मनोहर मोहिते, श्रमजीवी संस्थेचे अधिकारी राम कोळेकर, महाड शाखेचे व्यवस्थापक विठ्ठल कोळेकर, सहकारी संस्थांचे अध्यक्षा सौ.मेघ कदम, सेक्रेटरी पांडुरंग वाघे, मिथुन मुकणे ,गोविंद हिलंम ,विष्णू वाघमारे व संस्थांचे सभासद बहुसंख्येने उपस्थित राहून हा कार्यक्रम यशस्वी केला.

# मराठी राजभाषा दिनानिमित्त अलिबागेत राज्यस्तरीय साहित्य संमेलन

**नागोठणे : प्रतिनिधी**

मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून साहित्यसंपदातर्फे राज्यस्तरीय साहित्यसंमेलन अलिबाग येथे आयोजित करण्यात आले आहे. दिनांक १ मे रोजी आदर्श नागरी पतसंस्था येथे सकाळी १० ते ६ या वेळेत संमेलन पार पडेल अशी माहिती साहित्यसंपदा संस्थापक वैभव धनावडे यांनी दिली.

संमेलन अध्यक्ष जेष्ठ गझलकार ए.के. शेख व . सुरेश पाटील, संस्थापक आदर्श नागरी पतसंस्था यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. जेष्ठ पत्रकार नागेश कुलकर्णी आणि रायगड भूषण रमेश धनावडे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी अलिबाग मधील जेष्ठ कवी अनंत देवघरकर, कवयित्री वैशाली भिडे आणि इतर साहित्यिकांची उपस्थिती राहणार आहे.

संमेलनाची विशेष बाब म्हणजे जेष्ठ गझलकार ए.के. शेख, लेखक सुनील चिटणीस, रायगड भूषण, लेखक, कवी रमेश धनावडे, कवी दिलीप मोकल आणि कवी वैभव धनावडे या लेखकांच्या, कवींच्या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. मराठी भाषा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी योगदान देणाऱ्या निवडक संस्थांचा आणि व्यक्तींचा सन्मान साहित्यसंपदा 'मराठी दीपस्तंभ ' पुरस्कार देऊन करण्यात येणार आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस/जनतेस या जाहीर नोटीसी ने कळविण्यात येत आहे की, मौजे पालीखुर्द, ता. पनवेल, जि. रायगड येथील अंकुश चांगा जळे यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, भोगवटदार वर्ग २ प्रकारची शेतजमीन मिळकत कु.का. कलम प्रमाणे ४३ नियंत्रित सत्ता प्रकारची खालील वर्णनाची शेतजमिन मिळकत आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार केलेला आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे पालीखुर्द, तालुका. पनवेल, जि. रायगड.**

| कब्जेदारांची नावे | सर्व्हे नं./गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| अंकुश चांगा जळे | १ | १०/अ | ०-४७-२०<br>पो.ख. ०-०८-३३<br>एकुण ०-५५-५३ | ६.९६ |
| वर नमुद मिळकतीपैकी खरेदी करावयाचे क्षेत्र | | | ०-२०-०० गुंठे | |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अॅटचमेंट, लीज, एम.ओ.यु.वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर सक्षम येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकती चा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी/जनतेनी कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक : २८/०४/२०२५**

**सही/-**
**विजय भगत अॅन्ड असोशिएटस्**
**(अॅडव्होकेट अॅन्ड लिगल कन्सलटंट)**
**शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपीग कॉम्पलेक्स,**
**पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
मो.९८२०६०७५७२/९३२२६५२३१९
Email.vijaybhagat43@gmail.com


# गणित सुबोध परीक्षेत अनन्या तायडे रायगडमध्ये, तर आर्या फाटक तालुक्यात प्रथम

**माणगाव : बातमीदार ,प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर नारायण शिपुरकर आणि गणेश यशवंत वाघरे या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश मिळविले आहे. गणित सुबोध परीक्षेत अनन्या गजानन तायडे ही विद्यार्थीनी रायगड जिल्ह्यात प्रथम तर आर्या मिलिंद फाटक ही तालुक्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. त्याबद्दल शाळा प्रशासन, शिक्षक आणि विद्यार्थी यांचे सर्वत्र अभिनंदन आणि कौतुक होत आहे.







सुधाकर नारायण शिपुरकर या शाळेच्या इयत्ता पाचवीतील मिताली जगदाळे, निर्मिती नाईक,सुर्यकांत गायकवाड, आरती परमार तर गणेश यशवंत वाघरे या शाळेच्या अनन्या तायडे, सुहाना तेटगुरे, आर्या फाटक, कार्तिक अडे, साईश नाडकर, नक्ष रोकडे हे १० विद्यार्थी महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत.

रायगड जिल्हा गणित आणि विज्ञान अध्यापक मंडळाने आयोजित करण्यात आलेल्या गणित सुबोध परीक्षेत सुधाकर नारायण शिपूरकर प्री प्रायमरी अँड प्रायमरी इंग्लिश मिडीयम स्कूल इयत्ता पाचवीतील मिताली जगदाळे याने रायगड जिल्हा सुबोध गणित शिष्यवृत्ती परीक्षेत चौथा क्रमांक तर सुर्यांश गायकवाड याने तालुका स्तरीय सहावा क्रमांक पटकावला आहे. एकुण १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.गणेश यशवंत वाघरे इंग्लिश मिडीयम स्कूल मधील इयत्ता ८ वी तील विद्यार्थी २४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

या सर्वांचे संस्थेचे अध्यक्ष अॅड. राजीव साबळे, सेक्रेटरी कृष्णा गांधी, नितीन बामगुडे, डॉ. आबासाहेब पाटणकर, अशोक दादा साबळे विधी महाविद्यालयाचे चेअरमन अॅड. विनोद घायाळ, नर्सिंग कॉलेजचे चेअरमन डॉ. गौतम राऊत यांनी अभिनंदन केले.

# जि.प. सेस फंड योजनेंतर्गत २ मेपासून अर्जस्वीकृती

**रोहा : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद सेस फंड योजनेंतर्गत पंचायत समिती कृषी विभागाकडून विविध योजनाकरीता २ मे पासुन अर्ज स्वीकारणार असुन यासाठी रोहा तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी अर्ज करावेत असे आवाहन रोहा पंचायत समिती कृषी विभागाकडुन कृषी अधिकारी रणजीत लवाटे यांनी केले आहे.

विविध योजने मध्ये ७५ टक्के अनुदानाने ताडपत्री पुरवठा करणे,७५ टक्के अनुदानाने सौर दीप संच पुरवठा करणे, ७५ टक्के अनुदानाने तार ( काटेरी, जाळी तार )कुंपण पुरवठा करणे, ७५ टक्के अनुदानाने मलचिंग पेपर पुरवठा करणे,७५ टक्के, अनुदानाने सेंद्रीय शेती प्रोत्साहन योजना,७५ टक्के अनुदानाने सुधारित औजारे पुरवठा करणे ( ओपनवेल पंप ३**एचपी ,5एचपी**, डिसेल पंप ३**एचपी , ५एचपी,** बॅटरी ऑपरेटेड फवारणी पंप, गवत कापणी यंत्र, चेन सॉ,**एचटीपी** स्प्रे पंप, इ.),७५ टक्के अनुदान एचडीपीइ / **पीव्हीसी** पाईप पुरवठा करणे व बायोगॅस संयंत्र पुरवठा करणे या योजनेचा समावेश आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत, सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे-

**मौजे-लोणीवली, तालुका पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भुमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ७/३ | ०-२५-००<br>पो.ख. ०-०४-३०<br>एकुण क्षेत्र ०-२९-३० | ५.९४ | अर्जना लक्ष्मण मालुसरे<br>काशिनाथ लक्ष्मण मालुसरे<br>पुंडलिक भाऊ मालुसरे<br>प्रतिमा भाऊ मालुसरे<br>ललिता भाऊ मालुसरे<br>विठोबा लक्ष्मण मालुसरे |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी. दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल**
**दिनांक : २९/०४/२०२५**

**सही/-**
**अॅड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय: २. आशादिप अपार्टमेंट**
**वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ**
**अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल**
**मो. क्र.: ९९३०३६९८६१**


# महाराष्ट्र गौरव रथ यात्रेचे वाकण येथे जोरदार स्वागत

**नागोठणे : प्रतिनिधी**

राष्ट्रवादीचे प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अजितदादा पवार गट राष्ट्रवादी काँग्रेसचे अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस पप्पा सावंत यांच्या नेतृत्वाखाली महाडच्या ऐतिहासिक चवदार तळे वरील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून निघालेल्या महाराष्ट्र गौरव कोकण विभाग रथ यात्रेचे मंगळवार दि. २९ एप्रिल रोजी वाकण येथे जोरदार स्वागत करण्यात आले.




तदनंतर पाटणसई येथील कविता राणे, सुचिता राणे, तृप्ती धाभाडे, करिष्मा मिनमीने, रोशनी राणे या अंगणवाडी सेविका, मदतनीस व अशा सेविका यांनी रांगोळी काढून रथ यात्रेत पूजे साठी ठेवण्यात आलेले मंगलजल ( कोकणातील सर्व महानद्यांचे पाणी) कलश व मंगलमृदा (कोकणातील महापुरुषांच्या जन्म भूमीतील माती) कलश यांची आरती करून पूजन केले. यावेळी उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी देखील कलशाचे पूजन केले.

महाराष्ट्र गौरव रथ यात्रेचे वाकण येथे आगमन झाले त्यावेळी नागोठणे विभाग राष्ट्रवादीचे नेते दिलीप टके, शिवरामभाऊ शिंदे, हरीशशेठ काळे, राकेश शिंदे, नागोठणे सपोनि सचिन कुलकर्णी, विभागीय अध्यक्ष संतोष कोळी, शहर अध्यक्ष बाळासाहेब टके, विभागीय सरचिटणीस सचिन कळसकर, अतुल काळे, जुगनशेठ जैन, जानू वारगूडा, तुकाराम राणे, मनोज टके, चेतन टके, ऍड. श्रीकांत रावकर, रोशन पारंगे, विजय पारंगे, अंकुश ताडकर, संतोष ताडकर, बाळकृष्ण देवरे, मनोज ताडकर, बिपीन सोष्टे, अमित जांबेकर, घनश्याम ताडकर, मोरेश्वर सगणे, सचिन नेरपगार, प्रदिप मिनमीने, राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला पदाधिकारी आशा शिर्के, सुजाता जवके, अमिता शिंदे, पूनम काळे, सुनिता तटकरे आदी प्रमुख पदाधिकारी यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसच्या महाराष्ट्र गौरव रथ यात्रा वाकण मार्गे पाली, खालापूर, कल्याण, ठाणे, वसई मार्ग मुबंई येथे गेल्यानंतर कोकण रथ यात्रेची सांगता होणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस पप्पा सावंत यांनी दिली.

## निवडक

### मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** शहरातील महाड अर्बन बँकेजवळ उभी करून ठेवलेली ९० हजार रुपये किंमतीची मोटार सायकल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. हर्षद ठाकूर यांनी त्यांची ९० हजार रुपये किंमतीची होंडा एसपी १२५ डिक्स मोटरसायकल (एमएच-४६-सीडब्ल्यू-१०७५) ही उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर गाडी चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### गावठी दारू हस्तगत


**पनवेल :** तालुक्यातील मोरबे येथील पत्र्याच्या शेडसमोर विना परवाना गैरकायदा गावठी दारु जवळ बाळगल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी एका व्यक्तीवर कारवाई केली आहे. या व्यक्तीकडे जवळपास ४०० रुपये किंमतीची गावठी दारू आढळून आल्याने त्याच्याविरोधात महाराष्ट्र दारू बंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

### ओरायन मॉलचा वर्धापन दिन



**पनवेल :** शहरातील ओरायन मॉलचा नववा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात थाटामाटात सिनतारकांच्या उपस्थितीत झाला. या वेळी आगामी काळात प्रदर्शित होणाऱ्या गुलकंद या चित्रपटाचे दिग्दर्शक सचिन गोस्वामी, लेखक सचिन मोटे, चित्रपटातील कलाकार समीर चौघुले, ईशा डे आदींच्या मान्यवरांच्या उपस्थितीत मुलाखतीने कार्यक्रमाची सुरूवात झाली. या वर्धापन दिनी नऊ विजेत्यांना ओरायन मॉलच्या माध्यमातुन विशेष आकर्षक बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. याकरिता मॉल प्रशासनाने आयोजित केलेल्या शॉप अँड विन कॉन्टेस्टच्या विजेत्यांची निवड उपस्थित मराठी चित्रपटातील सेलेब्रिटींनी केली. या कार्यक्रमाला ओरायन मॉलचे मालक मंगेश परुळेकर, दिपक करेलिया, मनन परुळेकर आदी उपस्थित होते.

### श्रोणवी लोंढेचे शिष्यवृत्तीत यश



**पनवेल :** करंजाडे गावाचे पोलीस पाटील भिम अनुयायी कुणाल लोंढे यांची कन्या श्रोणवी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (पीएसएस) आठवी मेरिट मध्ये उत्तीर्ण झाली आहे. या तिच्या यशाबद्दल तिच्या शाळेसह समाज बांधव, विविध संघटना, ग्रामस्थांनी तिचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### उद्या ध्वजारोहण कार्यक्रम

**नवी मुंबई :** महाराष्ट्र राज्याच्या ६६व्या स्थापना दिनानिमित्त कोकण विभागीय स्तरावरील शासकीय ध्वजारोहण गुरुवार १ मे २०२५ रोजी सकाळी ८ वाजता विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांच्या हस्ते कळंबोली सेक्टर १७ येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर होणार आहे. महाराष्ट्र राज्यच्या ६६ व्या स्थापना दिनाचा हा सोहळा सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करून यशस्वीरित्या व उत्साहात साजरा होणार आहे. राष्ट्रध्वज वंदन व संचलन समारंभास नागरिक, पत्रकार, शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय पोषाखात उपस्थित राहावे. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने कृपया कोणतीही बॅग सोबत आणू नये, उन्हाची तीव्रता लक्षात घेता उपस्थितांनी आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# मंत्री गणेश नाईक यांच्याकडून मान्सूनपूर्व आढावा

## कामे मार्गी लावण्याचे निर्देश




**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्यापूर्वीच्या कामांचा आढावा घेण्यासाठी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली सिडको प्रदर्शनी केंद्रातील सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीत नवी मुंबई महानगरपालिका, पोलीस विभाग, सिडको, महानगर गॅस, महावितरण आदी विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत गणेश नाईक यांनी शहरातील सखल भागांमध्ये पावसाळ्यात पाणी साचणार नाही यासाठी विशेष दक्षता घेण्याचे निर्देश दिले. सर्व नाल्यांची वेळेत व योग्य प्रकारे स्वच्छता करण्याचे तसेच रस्त्यांवरील कामे वेळेत पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी दिले. याबरोबरच गटारावरील चेंबर्स सुस्थितीत असल्याची खात्री करून घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

रेल्वे प्रशासनाने ट्रॅकमधील कचरा त्वरित स्वच्छ करण्याच्या सूचना दिल्या. पावसाळ्यातील आपत्तींना तोंड देण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याची सूचना केली. बैठकीत सर्व यंत्रणा आगामी पावसाळ्याच्या दृष्टीने सज्ज असल्याचे दिसले, मात्र तरीही अधिक सतर्क राहण्याचे आदेश नामदार नाईक यांनी दिले आहेत.

या आढावा बैठकीला माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी महापौर सागर नाईक यांच्यासह ज्येष्ठ लोकप्रतिनिधीही उपस्थित होते.

# अनधिकृत बांधकामावर कारवाई

## ऐरोली, नेरूळ विभागात धडक मोहीम





**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात अतिक्रमण विभागाने ऐरोली व नेरूळ विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली अंतर्गत सेक्टर ४ येथील बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे केलेले होते. त्यांनी अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविले नसल्याने अतिक्रमण मोहिम राबवून सदर बांधकाम अंशत: निष्कासित करून दंडात्मक शुल्क २५,००० रुपये वसुल करण्यात आले आहे.

या धडक मोहिमेसाठी ऐरोली विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी सुनील काठोळे, कनिष्ठ अभियंता संदिप म्हात्रे, तसेच जी विभाग ऐरोली, येथील अधिकारी / कर्मचारी तसेच अतिक्रमण पोलीस पथक उपस्थित होते. मोहिमेकरीता एक गॅस कटर, दोन हॅमर व १० मजूर यांचा वापर करण्यात आलेला आहे.

तरनवी मुंबई महापालिका बी विभाग नेरूळ कार्यक्षेत्राअंर्तगत एम.आय.डी.सी. क्षेत्रातील महात्मा गांधी नगर येथे बऱ्याच प्रमाणात झोपडयांचे अनधिकृत बांधकाम होत आहे तसेच सदर ठिकाणी अनधिकृतपणे खाद्यपदार्थ विक्री करिता स्टॉल उभारण्यात आले असल्याची तक्रार प्राप्त झाल्याने सदर जागेत उभारण्यात आलेले अनधिकृत खाद्यपदार्थ स्टॉल, पानटपरी व सुमारे ५० झोपड्या जमिनदोस्त करण्याची कारवाई करण्यात आली आहे. त्याबरोबर डी-ब्लॉक मधील पाण्याच्या पाईपलाईन लगत असलेल्या श्रीकृष्णा भोजनालय या हॉटेलवर निष्कासन कारवाई करण्यात आली.

कारवाईदरम्यान १० सिलेंडर, २ ते ३ कांदा-बटाटा गोणी, ३८-खुर्च्या, तीन टेबल फॅन, तीन शेगडी, तीन कढई, एक जर्मन पातेले, पानटपरी साहित्य एक कॅरेट इतके साहित्य जप्त करण्यात आले असून, कोपरखैरणे क्षेपणभूमी येथे जमा करण्यात आले आहे.

# खारघर ते वर्ल्ड ट्रेड सेंटर बससेवा पूर्ववत करावी

## ब्रिजेश पटेल यांची मागणी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर ते वर्ल्ड ट्रेड सेंटर या मार्गावरील बंद करण्यात आलेली बससेवा पूर्ववत सुरू करण्यात यावी, अशी मागणी भाजपचे रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी नवी मुंबई महापालिका महाव्यवस्थापक (बेलापूर) यांच्याकडे निवेदन दिले आहे.

ब्रिजेश पटेल यांनी दिलेल्या निवेदना म्हटले आहे की, मार्ग/बस क्रमांक ११०च्या खारघर ते वर्ल्ड ट्रेड सेंटर या मार्गावर यापूर्वी सकाळी ३ बसेस धावत होत्या. (७.१०, ७.२०, ७.३०) परिवहन प्रशासनाकडून तुडुंब भरून धावणाऱ्या या बसेसपैकी याआधीच सकाळी ७.२० वाजता सुटणारी बस बंद करण्यात आली, आणि आता १६ एप्रिल, २०२५ पासून ७.१० वाजताची संपूर्ण भरून जाणारी बस सेवाही प्रशासनाकडून बंद करण्यात आली. या मार्गावर प्रवास करणाऱ्या गरजू प्रवाशांच्या सुविधा विचारत न घेता मनमानी पद्धतीने दोन सेवा बंद करण्यात आल्या, यामुळे प्रवाशांची गैरसोयी होत आहे. प्रशासनाचा कारभार हा जनतेच्या सोयीसाठी असणे अपेक्षित असताना असा आतताई निर्णय घेणे अनाकलनीय आहे.

प्रशासनास दोन बसमधून प्रवास करणाऱ्या जनतेच्या वतीने आपणास नम्र विनंती करतो की, या दोन्ही बसेस पुन्हा सामान्य जनतेच्या सेवेकरीता विनाविलंब सुरू कराव्यात.



**मोहोपाडा : परिसरातील नागरिकांना शासकीय दाखले माफक दरात लवकर उपलब्ध व्हावेत यासाठी ग्रुप ग्रामपंचायत वासांबे येथे आपले सरकार सेवा केंद्राचे उद्घाटन सोमवारी सरपंच उमा मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील, ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी, केंद्र चालक प्रणाली म्हात्रे आदी उपस्थित होते.**

# संत शिरोमणी गोरा कुंभार यांची पुण्यतिथी




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजापती समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी श्री गोरा कुंभार (गोरोबा काका) यांची ७०८ वी पुण्यतिथी संत श्री गोरा कुंभार प्रतिष्ठान सामाजिक संस्था कुंभारवाडा पनवेलतर्फे श्रद्धेने करण्यात आली.

समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींचा व हुशार विद्यार्थ्यांनाही सन्मानित करण्यात आले आहे. या वेळी प्रजापती समाज विकास मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष रजि. राष्ट्रीय सामाजिक संघटना सी.पी. प्रजापती, रायगड जिल्हा सचिव इंदर प्रजापती आणि इतर सदस्यांनीही सहभाग घेतला. आयोजकांनी महाप्रसादाचेही आयोजन केले होते.

आयोजकांमध्ये अध्यक्ष किरण काळवेकर, कार्याध्यक्ष रितेश पनवेलकर, उपाध्यक्ष प्रसाद पनवेलकर, सचिव अधिवक्ता आशिष पनवेलकर, कोषाध्यक्ष नरेंद्र पनवेलकर यांच्यासह सर्व समिती सदस्यांनी सहभाग घेतला आणि कार्यक्रम यशस्वी केला.

# ज्येष्ठ पनवेलकरांसोबत महापालिकेचा संवाद मेळावा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्येष्ठ पनवेलकर अर्थातच सिनीअर सिटीजन यांच्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या संकल्पनेतून मंगळवारी (दि.२९) ज्येष्ठ पनवेलकर संवाद स्नेह मेळावा व प्राथमिक आरोग्य तपासणी शिबिर तसेच सेवा हमी हक्क कायदा जनजागृती कार्यक्रम मोठ्या उत्साहात वडाळे तलाव येथे सुर्योदयाच्या साक्षीने झाला.

संवाद मेळाव्याचे उद्घाटन आमदार विक्रांत पाटील यांच्या हस्ते नटराजपूजन करून करण्यात आले. प्रास्ताविक परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी केले. प्राथमिक आरोग्य तपासणी या कार्यक्रमात मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या वेळी डॉ. गोसावी यांनी सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दुपारी २ ते ४ ही वेळ जेष्ठ नागरिकांसाठी राखीव असल्याची माहिती दिली. त्याचा लाभ ज्येष्ठ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन केले. या आरोग्य तपासणी शिबिराचा सुमारे १४१ ज्येष्ठ नागरिकांनी लाभ घेतला.

मराठी, हिंदी गाण्यावरती त्यांनी आपल्या जोडीदारांसोबत, मित्रांसोबत, मैत्रिणीसोबत नृत्य करून आजचा आंतरराष्ट्रीय नृत्य दिवस साजरा केला. या कार्यक्रमांतर्गत सर्व उपस्थित जेष्ठ पनवेलकरांना भेटवस्तू देण्यात आली. सूत्रसंचालन व आभार मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर यांनी केले.

सांस्कृतिक कार्यक्रमाचे संयोजन शुभा जोशी व अजितेम जोशी यांनी केले तर गायक दत्ता मेस्त्री व गायिका पौर्णिमा काकडे, स्वाती हरवंदे यांनी गाणी सादर केली. संगीत संयोजन किशोर नागरे तर निवेदन मंदार खराडे यांनी केले.




# आदिवासींना शिलाई यंत्राचे वाटप

## समस्या सोडविण्याची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील खवसावाडी या आदिवासीवाडीत रॅलीस इंडिया लिमिटेड आणि टीसीएस आरडी मीठापुर (गुजरात) यांच्या उन्नत ग्राम प्रकल्पांतर्गत शिवण कलेचे प्रशिक्षण घेतलेल्या १२ आदिवासी भगिनींना शिलाई यंत्र वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते या शिलाई यंत्राचे वाटप करण्यात आले.




येथील खवसावाडीसह पाच आदिवासी वाड्यांमध्ये स्वातंत्र्यापासून आजपर्यंत रस्ता, पाणी, शिक्षण यासारख्या पायाभूत सुविधा देण्यास कुचकामी ठरलेल्या शासकीय व्यवस्थेचे बळी आदिवासी ठरत असल्याचे सांगत सामाजिक कार्यकर्त्यांसह स्थानिक आदिवासी बांधवांनी जिल्हाधिकाऱ्यांसमोर समस्यांचा पाढाच वाचला.

खवसावाडीच्या रस्त्यायबाबत प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या कार्यकारी अभियंता यांना वारंवार सांगूनही रस्त्याचे काम सुरू न केल्यामुळे चार-पाच किलोमीटरची पायपीट करून वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे आम्हा आदिवासींना उपचाराविनाच जीव गमवावा लागत असल्याचे वास्तव स्थानिक आदिवासी ग्रामस्थ सुनील यशवंत वाघमारे, काल्या पदया कडू यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

या वेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सकारात्मक पाऊल उचलून दुर्गम अशा आदिवासी वाडीमध्ये येऊन आदिवासींच्या व्यथा जाणण्याचा प्रयत्न केल्याबद्दल ग्रामसंवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संतोष ठाकूर यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे आभार मानले.

ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. सिद्धार्थ इंगळे यांनी रायगड जिल्ह्यातील आदिवासींची परिस्थिती लक्षात घेता रायगड जिल्ह्यात पेसा कायदा लागू करण्यासह आदिवासींच्या जमिनींचे होणारे गैरव्यवहार तत्काळ थांबवून दोशींवर कारवाई करण्याची मागणी केली.

या कार्यक्रमास रॅलीस इंडिया च्या उन्नत ग्राम प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार श्रीकांत म्हात्रे उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्रीमती तेजस्विनी गलांडे, पेण तालुका कृषी अधिकारी वाडकर, बोरगाव सरपंच ताई खाकर, तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, आशा वर्कर आदी उपस्थित होते.

# स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करून यशाला गवसणी घाला -डॉ. चव्हाण

**मुरुड : प्रतिनिधी**

विविध स्पर्धा परिक्षांचा अभ्यास करून यशाला गवसणी घालावी. मोबाईलमध्ये न राहता जास्तीत जास्त स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करावा जेणेकरून भविष्यात आपण ही बिरुदेव डोने सारखे आयपीएस अधिकारी बनु शकता, असे प्रतिपादन महाविद्यालय विकास समिती सदस्य तथा माजी प्राचार्य डॉ. विश्वास चव्हाण यांनी कोकण उन्नती मित्र मंडळ वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या सभागृहात शैक्षणिक वर्ष २०२३-२४मुंबई विद्यापीठाची पदवी पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ कार्यक्रमावेळी बोलत होते.



या वेळी प्राचार्य डॉ जनार्दन कांबळे, परिक्षा विभाग प्रमुख -डॉ.सुभाष म्हात्रे, महाविद्यालय विकास समिती सदस्य सुभाष महाडिक, महाविद्यालय विकास समिती सदस्य वासंती उमरोटकर, डॉ.श्रीशैल बहिरगुडे, डॉ.मुरलीधर गायकवाड, डॉ. सीमा नाहिद, प्राध्यापक -सिध्देश सतविडकर, डॉ. नारायण बागुल, मोहिद हसवारे आदिंसह विद्यार्थी व पालक वर्ग उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र राज्य गीताने व मुंबई विद्यापीठाचे गीत सादर करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. प्राचार्य डॉ जनार्दन कांबळे यांनी प्रास्ताविक करताना म्हणाले की विद्यार्थ्यी, महाविद्यालय व शिक्षकांसाठी हा गौरवाचा दिवस आहे. आज १५० विद्यार्थ्यांना पदवी प्राप्त होणार आहे.

महाविद्यालय विकास समिती सदस्य वासंती उमरोटकर आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, गेले तीन वर्षे सतत अभ्यास केल्याने पोच पावती म्हणून तुम्हाला पदवीप्रदान वितरण होणार आहे हाच विद्यार्थ्यांना साठी आनंदाचा दिवस आहे. बॅ.ए आर अंतुले यांनी मुरुड शहरात महाविद्यालय काढल्यामुळे मुरूड शहरांसह पंचक्रोशी भागातील असंख्य विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन पदवी प्राप्त करून आज मोठ्या पदावर कार्यरत आहेत.

तुम्ही आज पदवी प्राप्त करणार आहात. लक्षात ठेवा परिस्थिती माणसाला घडवत नाही बिघडवत नाही माणुसच परिस्थितीला बिघडतो. तरी संघर्ष करा फळ नक्कीच मिळणार आहे. आजुन पुढील शिक्षण प्राप्त करून यश संपादन करा, असे आवाहन वासंती उमरोटकर यांनी केले.

# ब्राह्मण सभेचा वर्धापन दिन

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली ब्राह्मण सभेच्या ३८व्या वर्धापन दिनानिमित्त खोपोलीतील शहरातील १२ ब्रह्मवृंद तसेच पाच सामाजिक कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र पेठे तर प्रमुख पाहुणे म्हणून सुनील भालेराव, सुधाकर आगाशे, अच्युत धर्माधिकारी गुरुजी, वृषाली बेलसरे उपस्थित होते.

वर्धापन दिनानिमित्त सत्यनारायण महापूजा, भक्ती भजनी मंडळाचे भजन व 'सूर तेच छेडीता' हा संगीताचा सदाबहार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

वैशाली ओक आणि कीर्ती कुलकर्णी यांनी गणेशवंदना, सरस्वती स्तवन सादर केले. अरविंद पाटणकर आणि मोरेश्वर पाटणकर यांनी विश्ववंदना म्हटली. धनंजय मराठे यांनी शंखनाद केला. सूत्रसंचालन अंबादास पाठक यांनी केले तर शेवटी उपाध्यक्षा सपना पित्रे यांनी आभार मानले.



# खोपोली येथे आरोग्य शिबिर



**खोपोली : प्रतिनिधी**

विक्रम साबळे फाउंडेशन आणि शेख ब्रदर्स व अपोलो हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने महाराजा मंगल कार्यालय खोपोली येथे विविध रोगावर उपचार व तज्ञ डॉक्टरांकडून मोफत आरोग्य तपासणी शिबिर झाले. या आरोग्य शिबिरामध्ये २५० ते ३०० नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला

या शिबिराचे उद्घाटन महाराजा मंगल कार्यालयाचे संचालक विक्रम साबळे व शेख ब्रदर्स करण्यात आले. या वेळी खोपोली शहरातील नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद देऊन आपल्या आरोग्याच्या विविध तपासणी डॉक्टरांच्या सल्ल्याने केल्या. या आरोग्य शिबिरामध्ये नेत्र तपासणी, डायबिटीज, ब्लेड प्रेशर, बॉडी मास इंडेक्स, बोन टेस्ट, इसीजी या विविध टेस्ट अपोलो हॉस्पिटलचे तज्ञ डॉक्टर यांच्या सल्ल्याने करण्यात आल्या.

या वेळी खोपोली नगरपालिकेचे माजी नगरसेवक व खालापूर शिक्षण प्रसारक मंडळाचे तथा जनता विद्यालयाचे अध्यक्ष कैलास भाऊ गायकवाड, माजी नगरसेवक अविनाश तावडे यांच्यासह खोपोली शहरातील विविध पक्षाचे सामाजिक संघटनेच्या पदाधिकारी यांनी या आरोग्य शिबिराला भेट देऊन शुभेच्छा दिल्या.



**अलिबाग : येथे सोमवारी जिल्हा शिक्षणाधिकारी पुनीता गुरव यांना माणगाव तालुक्यात राबविण्यात आलेल्या घर घर संविधान या उपक्रमाचा अहवाल गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांनी सादर केला. या वेळी उपशिक्षणाधिकारी सुनील भोपळे, उत्तेखोल केंद्रप्रमुख शंकर शिंदे व घर घर संविधान या उपक्रमाचे माणगावच्या समन्वयक नुरखाँ पठाण उपस्थित होते.**

# सुधागडातील जि.प. नवघर शाळेला आयएसओ मानांकन

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक आदर्श नवघर शाळेस आंतरराष्ट्रीय स्तरावरील आयएसओ ९००१:२०१५ मानाकंन प्राप्त झाले आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी उत्कृष्ट शैक्षणिक व भौतिक सुविधा आणि उत्तम व्यवस्थापन या निकषाची तपासणी करून शाळेस आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे.



शनिवारी सुधागड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री सादुराम बांगारे यांच्या हस्ते केंद्रप्रमुख अनिल राणे यांच्या उपस्थितीत नवघर शाळेस आयएसओ मानांकन प्रदान करण्यात आले आहे. आयएसओ मानांकन प्राप्त झाल्याने विद्यार्थी, शिक्षक, पालक व ग्रामस्थ यांच्या मध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किसन जावळे, रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी नेहा भोसले, शिक्षणाधिकारी पुनिता गुरव, उपशिक्षणाधिकारी सुनील भोपळे व संतोष शेडगे यांच्या प्रेरणेतून व पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी लता मोहिते, गटशिक्षणाधिकारी सादुराम बांगारे, वरिष्ठ विस्तार अधिकारी नवनाथ साबळे, केंद्रप्रमुख अनिल राणे यांच्या मार्गदर्शनातून सध्याच्या स्पर्धेच्या युगात आपल्या जिल्हा परिषद शाळेत खासगी शाळेप्रमाणे विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध करून त्यांचा सर्वांगीण करण्याचे ध्येय समोर ठेऊन शाळेतील सर्व शिक्षकांनी स्वयंप्रेरणेने व शाळा व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने शाळा आयएसओसाठी नोंदणी केली.

आयएसओ मानांकन सोहळयाला ग्रुप ग्रामपंचायत नवघरच्या सरपंच माई चव्हाण, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राकेश जाधव, सदस्य निलेश जाधव, रोशनी चव्हाण, पूनम वाघमारे, अश्विनी वाघमारे, माजी मुख्याध्यापक जगदीश म्हात्रे, व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष रवींद्र जाधव, शिक्षक पालक संघांचे उपाध्यक्ष सुनील जाधव, धनंजय कारेकर आणि ग्रामस्थ व पालक उपस्थित होते.

# माय-द-देऊस वार्षिक उत्सवाला सुरुवात

**मुरूड : प्रतिनिधी**

माय द देऊस या वार्षिक उत्सवाला मोठ्या थाटामाटात सुरुवात झाली आहे. कोरलाई वरून मरिया मातेचे इमाज मोठ्या सन्मानाने सर्व शेतकरी वर्ग बैलगाडीने रेवदंडा या ठिकाणी तिचे स्थान असलेले ठिकाण गोला स्टॉपमध्ये माय द देऊस या ठिकाणी गेले तीनशे बारा वर्षांपासून विराजमान आहे.



ती सर्व आम्हा शेतकऱ्यांची रक्षण करती आहे. म्हणूनच आम्ही सर्व ख्रिस्ती शेतकरी तिला बैलगाडी न सन्मानाने मिरवणुकीने घेऊन येतो. अशी प्रतिक्रिया स्थानिक शेतकरी वर्गांनी दिली आहे.

पुढील नऊ दिवस लोक कोरलय ते रेवदंडा मोठ्या संख्येने तीर्थयात्रा करणार आहेत. मारिया मातेवर प्रेम व्यक्त करण्यासाठी आपल्या मनातील सर्व इच्छा व मनोकामना पूर्ण होण्यासाठी शेकडो ख्रिस्ती बांधव दर्शन घेण्यासाठी येथे येत असतात.अशी माहिती

माउंट कारमेल चर्चचे प्रमुख धर्मगुरू फादर बोनावेंचर नुनीस यांनी दिली. तर आजची प्रार्थना विधी फादर रिचर्ड लोपीस येशु संघीय धर्मगुरू ह्यांने अशीचे श्रद्धावान भक्त याविषयी प्रबोधन केले.आशा, प्रीती, विश्वास, श्रद्धा व इतर सहा सदगुणांना आपलं जीवन कसं भरावे याविषयी मार्गदर्शन केले. उत्सव आनंदात आणि प्रार्थनेत चालू झाला आहे. सर्वांनी शांततेसाठी प्रार्थना करून मनशांती मिळवणे खूप आवश्यक आहे. एकमेकाला मदत करून जीवन सुकर करणे खूप आवश्यक आहे.मनातील द्वेष भावना कायमची काढून टाकून भक्ती मध्ये विलीन व्हावे असे आवहन माउंट कार्मल चर्च कोरलाईचे धर्मगुरु फादर बोनावेंचर नूनीस यांनी केले आहे.

# चौकचे ग्रामपंचायत अधिकारी एस.पी.जाधव यांना पुरस्कार

**चौक : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत चौकचे विद्यमान ग्राम पंचायत अधिकारी एस.पी.जाधव यांना महाराष्ट्ररत्न पुरस्काराने सन्माननित करण्यात आल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




खालापूर तालुक्यातील ग्रूप ग्रामपंचायत चौकचे विद्यमान ग्राम पंचायत अधिकारी एस.पी.जाधव यांना नालंदा ऑर्गनायझेशन महाराष्ट्र राज्य यांच्या शाश्वत शेती मार्गदर्शन कार्यशाळा या कार्यक्रमात राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न पुरस्काराने डॉ. शेषराव पाटील आयएसएफ अधिकारी व जितेंद्र दाते चेअरमन एआजे इंडस्ट्रीज ग्रुप ऑफ कंपनी यांच्या हस्ते पुणे येथे सन्माननित करण्यात आले. ग्राम पंचायत अधिकारी एस.पी.जाधव यांनी अनेक मोठ्या व राजकीय वाद असणाऱ्या ग्राम पंचायतीमध्ये काम केले असून वादातून सुसंवाद साधून ग्राम पंचायतचा विकास साध्य करण्यासाठी प्रयत्न करीत असतात. स्वच्छ पाणीपुरवठा, स्वच्छता अभियान, वृक्ष लागवड, प्लास्टिक मुक्ती, दिवाबत्ती आणि ग्राम पंचायत कर वसुली वर त्यांचे काम वाखाणण्याजोगे आहे. खालापूर तालुक्यातील एक कार्यक्षम अधिकारी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. माझी वसुंधरा अभियान यशस्वी करण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले असून हे अभियान न राहता चळवळ उभी केली आहे. कोरोना काळात देखील त्यांनी उत्कृष्ट काम केले आहे. त्यांच्या कार्यक्षेत्रात इरसाल वाडी दुर्घटनेत त्यांनी अतिशय महत्त्वाचे काम केले असून तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान केला आहे. त्यांच्या कामाचे मूल्यांकन करण्यात आले होते.

# नागोठण्यात गोरोबा काका पुण्यतिथी

**नागोठणे : बातमीदार**

अखंड कुंभार समाजाचे आराध्य दैवत श्री संत शिरोमणी गोरोबा काका पुण्यतिथीनिमित्त ग्रामस्थ मंडळ व उन्नती महिला मंडळ कुंभार आळी नागोठणे यांच्या वतीने शनिवारी नागोठणे कुंभार आळीतील श्री गणेश मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान, पुण्यतिथी सोहळया निमित्त अनेक मान्यवरांनी मंदिरात येऊन श्री संत शिरोमणी गोरोबा काकांचे दर्शन घेतले.

पुण्यतिथी निमित्त काकड आरती, कळस स्थापना, दिंडी सोहळा, भजन, पुष्पवृष्टी, सत्यनारायणाची महापूजा, संगीत भजन, हरिपाठ, महाप्रसाद, कीर्तन आदी विविध धार्मिक कार्यक्रम झाले. श्री संत शिरोमणी गोरोबा काका पुण्यतिथी सोहळा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी ग्रामस्थ मंडळ कुंभारआळी नागोठणे अध्यक्ष विजय नागोठणेकर, उपाध्यक्ष मोहन नागोठणेकर, सेक्रेटरी सुधिर वाडेकर, खजिनदार संजय कोल्हटकर, सहखजिनदार मनोज गायकवाड, सहसेक्रेटरी किशोर नागोठणेकर, कार्याध्यक्ष सूर्यकांत गायकवाड, सल्लगार संतोष नागोठणेकर (सदस्य ग्रामपंचायत नागोठणे), श्रीधर नागोठणेकर, शरद वाडेकर, वसंत नागोठणेकर, अनिल नागोठणेकर, दिपक वाडेकर, विशाल नागोठणेकर, रायगड जिल्हा महिला कुंभार समाज अध्यक्षा प्रतिभा वाडेकर, कुंभार समाज रोहा तालुका अध्यक्ष दिपक नागोठणेकर, कुंभारआळी नागोठणे महिला मंडळ अध्यक्षा अर्चना नागोठणेकर, हभप मोरेश्वर नागोठणेकर, हभप केतकी नागोठणेकर व सर्व ग्रामस्थ मंडळ व उन्नती महिला मंडळ कुंभारआळी नागोठणे यांनी विशेष मेहनत घेतली.



# वेदक विद्यामंदिरच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीत यश



**तळा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आयोजित पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा ९ फेब्रुवारी २०२५ रोजी पार पडली. नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात गो.म.वेदक विद्यामंदिर तळाच्या चार विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

नील कमलेश पातेरे पाचवी, तर सार्थक कैलास वाडीकर, निदाल अनिस कुरुक्कर व स्वस्ती संतोष अवसरे या आठवीच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थ्यांचे यश हे अनेकदा त्यांच्या कठोर परिश्रमाचे आणि शिक्षणावरील दृढ विश्वासाचे प्रतीक असते. शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण संधी आहे तसेच आपल्या ज्ञानाची आणि कौशल्याची परीक्षा देण्याची संधी मिळते.

शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवणारे विद्यार्थी अनेकदा आपल्या शाळेचे आणि कुटुंबाचे नाव उज्ज्वल करतात. त्यांची ही यशोगाथा इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा देते. गो.म.वेदक विद्यामंदिर तळाच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत रोडे, उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे, सचिव मंगेश देशमुख, शाळा समितीचे चेअरमन महेंद्र कजबजे, प्राथमिक विभागाचे चेअरमन किरण देशमुख, पन्हेळी हायस्कूलचे चेअरमन श्रीराम कजबजे, शाळेचे मुख्याध्यापक दिलीप ढाकणे, सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# राजस्थानचा गुजरातवर शानदार विजय

## वैभव सूर्यवंशीची झंझावाती शतकी खेळी



**जयपूर : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये सोमवारी राजस्थान रॉयल्सने गुजरात टायटन्सविरुद्ध आठ विकेट्सने विजय मिळवला. या विजयाचा शिल्पकार ठरला १४ वर्षीय वैभव सूर्यवंशी. त्याने अवघ्या ३५ चेंडूत शतक ठोकले.

या सामन्यात गुजरातने राजस्थानसमोर २१० धावांचे लक्ष्य ठेवले होते. राजस्थान रॉयल्सने १५.५ षटकांत दोन विकेट्स् गमावत २१२ धावा करून आव्हान पार केले. वैभवसोबतच यशस्वी जैस्वालचे योगदान महत्त्वाचे राहिले. त्यानेही अर्धशतक ठोकले.

वैभवने गुजरातच्या सर्वच गोलंदाजांविरुद्ध मोठे फटके खेळताना ३५ चेंडूंत शतक ठोकले. त्याच्या खेळामुळे राजस्थानसाठी विजय सोपा झाला. त्याने ३८ चेंडूत १०१ धावांची खेळी केली. यात सात चौकार आणि ११ षटकारांचा समावेश होता.

नंतर जैस्वालला राजस्थानचा कर्णधार रियान परागने चांगली साथ दिली. या दोघांनीही राजस्थानच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. जैस्वाल ४० चेंडूत ७० धावांवर नाबाद राहिला. त्याने नऊ चौकार आणि दोन षटकार मारले. रियान परागने नाबाद ३२ धावा केल्या.

तत्पूर्वी, नाणेफेक हरल्यावर प्रथम फलंदाजी करताना गुजरातने २०९ धावा केल्या होत्या. गुजरातकडून कर्णधार शुभमन गिलने ५० चेंडूत ८४ धावांची खेळी केली, तर जोस बटलरने २६ चेंडूत ५० धावा केल्या. गुजरातने २० षटकांत ४ बाद २०९ धावा केल्या. राजस्थानकडून गोलंदाजीत महिश तिक्षणाने दोन विकेट्स् घेतल्या, तर जोफ्रा आर्चर व संदीप शर्माला प्रत्येकी एक विकेट मिळाली.

# वैभव सूर्यवंशीचा विश्वविक्रम : टी-२०मध्ये शतक ठोकणारा युवा फलंदाज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताच्या १४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने आयपीएलमध्ये ऐतिहासिक खेळी केली आहे. वैभवने या शतकासह अनोखा विश्वविक्रम आपल्या नावे केला आहे. आयपीएल आणि एकूणच टी-२० क्रिकेटच्या इतिहासात शतक करणारा वैभव सर्वात तरुण फलंदाज ठरला आहे.



वैभवने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील एकापेक्षा एक कमालीच्या गोलंदाजांविरुद्ध वादळी फटकेबाजी केली. त्याने इशांत शर्मासारख्या भेदक गोलंदाजी करणाऱ्या गोलंदाजाच्या षटकात चौकार-षटकारांची आतिषबाजी करीत २६ धावा केल्या. यासह वैभवने १७ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले, जे यंदाच्या आयपीएलमधील जलद अर्धशतक आहे.

वैभव सूर्यवंशीने षटकारांचा चौकारांची आतिषबाजी करत गुजरात टायटन्सचा आयपीएल पदार्पणवीर करीम जनतच्या षटकात तब्बल ३० धावा कुटल्या. संथ सुरुवात केल्यानंतर वैभव सूर्यवंशीने गियर बदलत ३५ चेंडूत शतक पूर्ण करत सर्वांनाच धक्का दिला. वैभवने ३८ चेंडूत सात चौकार आणि तब्बल ११ षटकारांसह १०१ धावांची खेळी केली. वैभवच्या या शतकानंतर खुद्द राहुल द्रविड यांनी दुखापत असताना उभे राहून टाळ्या वाजवत कौतुक केले.

# जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत कुर्डूस संघ विजेता



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन येथील र.ना. राऊत क्रीडांगणात नामदार आदिती चषक जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत मातृछाया कुर्डूस क्रीडा मंडळ अलिबाग या संघाने विजेतेपद पटकाविले.

शिवतेज मित्र मंडळ आणि श्रीवर्धन तालुका राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या स्पर्धेचे उद्घाटन महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते झाले. स्पर्धेत जिल्ह्यातील २४ नामांकित संघांनी सहभाग घेतला होता. कबड्डीप्रेमींनी क्रीडांगणात मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्पर्धेची रंगत वाढवली.

व्यासपीठावर शिवतेज मित्र मंडळाचे अनंत गुरव, काशिनाथ गुरव, मानस भगत, राष्ट्रवदी श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष मोहंमद मेमन, तालुका अध्यक्ष दर्शन विचारे, शहर अध्यक्ष जितेंद्र सातनाक, महिला तालुका अध्यक्ष सबा फिरफिरे, शहर अध्यक्ष राजसी मुरकर आणि राष्ट्रीय कबड्डीपटू रिशांक देवाडीगा उपस्थित होते

स्पर्धेत द्वितीय क्रमांक जय हनुमान धेरंड क्रीडा मंडळ अलिबाग, तृतीय पांडवादेवी रायवाडी क्रीडा मंडळ अलिबाग आणि चतुर्थ क्रमांक भैरवनाथ यशवंतखार क्रीडा मंडळ रोहा या संघाने प्राप्त केला. चारही विजेत्या संघांना पारितोषिक देण्यात आले. त्याचप्रमाणे सर्वोत्कृष्ट खेळाडू निखिल शिर्के (कुर्डूस), उत्कृष्ट पकड करणारा समीर हिरवे (धरंड), उत्कृष्ट चढाईपटू रोशन मडवी (यशवंतखार) यांना गौरविण्यात आले. पारितोषिक वितरण दर्शन विचारे, अनंत गुरव, काशिनाथ गुरव, फैसल हुर्जुक, निवृत्ती वाघे यांच्या हस्ते झाले.

# राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धेत महाराष्ट्राचे दुहेरी यश



**पनवेल : वार्ताहर**

राष्ट्रीय डॉजबॉल स्पर्धा कर्नाटकातील मंगळुरू येथे झाली. या स्पर्धेत महाराष्ट्र संघाने दुहेरी यश मिळविले. पुरुष संघाने विजेतेपद, तर महिला संघाने उपविजेतेपद पटकाविले आहे. या संघात रायगड जिल्ह्यातील ११ खेळाडूंचाही समावेश होता.

स्पर्धेकरिता देशभरातून पुरुषांचे ३२, तर महिलांचे २९ संघ सहभागी झाले होते. महाराष्ट्राच्या पुरुष संघात वरद शिंपी, विक्रम जयस्वाल, आर्यन पाटील, सर्वेश पाटील, मितांशु करपे, करमनसिंग हुंडल हे सहा जण, तर महिला संघात तिथी प्रामाणिक, श्रावणी दिवेकर, आरती पाटील, लास्या राव व साईवी भोसले या पाच जणींचा सहभाग होता. यातील साईवी हिला स्पर्धेतील उत्कृष्ट संरक्षक म्हणून गौरविण्यात आले आहे. खेळाडूंच्या या यशाबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

# रॅपिड चेस स्पर्धेत शिफा शेख विजेती

**पोलादपूर : प्रतिनिधी**

आकार प्रतिष्ठानतर्फे पोलादपूर तालुक्यातील लोहारे येथील साने गुरूजी माध्यमिक विद्यालयात गतिमान बुद्धीबळ (रॅपिड चेस) स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेच्या खुल्या गटात शिफा शेखने विजेतेपद पटकाविले.



स्पर्धेत राज्यभरातील एकूण ९६ स्पर्धकांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन सहयोग प्रतिष्ठानचे अध्यक्ष रमेश चव्हाण व आकार प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय सलागरे यांच्या हस्ते बुद्धीबळ खेळून झाले.

स्पर्धेस पत्रकार संघाचे कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर, आकार प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष रामदास सकपाळ, ज्ञानेश्वर सकपाळ, सचिव राजाराम शेलार, खजिनदार रविकांत सकपाळ, सहखजिनदार सुनील चव्हाण, सुरेंद्र जाधव, अजितकुमार जंगम, विजय दरेकर, लिलाजी शेडगे, विश्वस्त सुखदेव मोरे, माध्यमिक मुख्याध्यापिका सुगंधा वाढवळ, सुखदेव मोरे, विजय दरेकर, सुरेंद्र जाधव आदी उपस्थित होते. विजेत्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन अमर सलागरे यांनी केले.

### गटनिहाय निकाल

खुला गट प्रथम क्रमांक शिफा शेख, द्वितीय कशीफ महालूनकर, तृतीय अनादय पाटील, चतुर्थ सुवश वाठोरे, पाचवा सिद्धार्थ चौगुले, सहावा गौतम पवार, सातवा स्वरूप योगी, उत्तेजनार्थ अपेक्षा मारभळ व दिलीप पाटील; १५ वर्षाखालील मुले : प्रथम वेदांत मेहता, द्वितीय आयंष्य टेंबे, तृतीय रूद्र जाधव, चतुर्थ शर्व पाटकर, पाचवा प्रथमेश वेल्हाळ, सहावा अर्णव सलागरे, मुली : प्रथम आर्या जाधव, द्वितीय आर्या पानसरे तृतीय भार्गवी नायडू; ११ वर्षाखालील मुले : प्रथम स्वर पटेल, द्वितीय आशुतोष कुलकर्णी, मुली : प्रथम पूर्वी टेंबे; १५ वर्षाखालील मुले : प्रथम राजवीर जाधव, द्वितीय सुधांशू कुमठेकर, तृतीय यश मोरे, चतुर्थ आर्यन कोळेकर, पाचवा मिहिर शेठ, सहावा आर्यन येरुणकर, सातवा विक्रांत मोरे, मुली : प्रथम स्वरूपा महाडिक, द्वितीय संस्कृती भीमाशंकर जाधव; ११ वर्षाखालील मुले : प्रथम अर्णव कोळेकर, द्वितीय वेदांत कासार, मुली : प्रथम समृद्धी जाधव, द्वितीय स्वरा पवार.

# आयसीसी स्पर्धेसाठी जपान क्रिकेट संघ पात्र

**दुबई** : आयसीसी स्पर्धा खेळण्याचे स्वप्न प्रत्येक क्रिकेट संघ पाहतो, परंतु काही निवडक संघांचेच हे स्वप्न प्रत्यक्षात साकार होते. यात जपानच्या क्रिकेट संघाने बाजी मारली आहे. जपान संघाने आयसीसी अंडर-१९ पुरुष विश्वचषक २०२६साठी पात्रता मिळवली आहे. ईस्ट एशिया पॅसिफिक क्वालिफायरमध्ये सर्व चार सामने जिंकत त्यांनी अंडर-१९ विश्वचषकाचे तिकीट मिळवले.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com